रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १७ ◆ अंक ३५२
www.ramprahar.com

बुधवार ९ जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

अनुकंपा तत्वावर १८ जणांना मिळाली पालिकेची नोकरी/२
रायगडातील १२ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या/५
'सेना' देशांमध्ये टीम इंडिया नंबर वन!/८

## पीएफच्या खात्यात जमा झाले व्याजाचे पैसे

**नवी दिल्ली :** कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटने (ईपीएफओ)च्या सात कोटी सदस्यांसाठी खूशखबर आहे. केंद्र सरकारने २०२४-२५ या वर्षासाठीच्या पीएफच्या व्याजाची रक्कम सदस्यांच्या खात्यामध्ये जमा केली आहे. वित्त मंत्रालयाकडून व्याजदराची घोषणा करण्यात आल्यानंतर जवळपास दोन महिन्यांच्या आत ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. अधिकृत आकडेवारीनुसार या वर्षी ३३.५६ कोटी सदस्यांची खाती असलेल्या १३.८८ लाख संस्थांसाठी वार्षिक खाती अपडेट करण्यात येणार होती. ८ जुलैपर्यंत १३.८६ लाख संस्थांच्या ३२.३९ कोटी सदस्यांच्या खात्यामध्ये व्याज जमा करण्यात आला आहे. अधिकृत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ९९.९ टक्के संस्था किंवा कंपन्या आणि ९६.५१ टक्के खात्यांसाठी वार्षिक अकाऊंट अपडेट पूर्ण झाले आहे, तर उर्वरित खात्यांमध्ये या आठवड्यात व्याज पाठवला जाईल.

### दारूमुक्त खारघरसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांची लक्षवेधी सूचना

# विहित प्रक्रियेनुसार निवेदन प्राप्त झाल्यास योग्य ती कार्यवाही -उपमुख्यमंत्री पवार

**मुंबई : प्रतिनिधी**

खारघर परिसरात दारूबंदी करण्याबाबत विहित प्रक्रियेनुसार निवेदन प्राप्त झाल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. खारघर परिसरातील दारू विक्री परवाना रद्द करून दारूमुक्त क्षेत्र म्हणून घोषित करण्याबाबत विधानसभा सदस्य प्रशांत ठाकूर यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना उपमुख्यमंत्री पवार विधानसभेत बोलत होते.





मुंबई येथे सुरू असलेल्या विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडताना खारघर परिसरातील नागरिकांची दीर्घकाळाची दारूबंदीची मागणी, स्थानिक चळवळीचा इतिहास आणि शासन यंत्रणेने आवश्यक ती कार्यवाही करावी, या मुद्द्यावर सविस्तरपणे प्रकाश टाकला. आजच्या काळामध्ये खारघरची गणना ही अत्याधुनिक अशा पद्धतीच्या शहरांमध्ये होत आहे, पण रस्त्यावर असलेल्या या गावांमध्ये सगळ्यात पहिल्यांदा २००२ साली दारू विक्रीचा परवाना दिला गेला. त्या आधी या ठिकाणी कुठलाही दारूचा परवाना नव्हता आणि त्या अनुषंगाने दारू विक्रीचे त्या ठिकाणी दुकान नव्हते. २००२ साली या ठिकाणी पहिला परवाना दिला गेला आणि तेव्हापासून या दारू विक्रीला विरोध सुरू झाला. वेगवेगळ्या पद्धतीची निवेदन देत दारूबंदीच्या संदर्भामध्ये मागणी होत या ठिकाणी दारूबंदी झाली आणि तसा ठरावही तत्कालीन खारघर ग्रामपंचायतीने केला. दारू विक्री सुरू होत आहे आहे कळताच दारूबंदीसाठी या ठिकाणी वेगवेगळ्या टप्प्यावर या दारूच्या दुकानांच्या विरोधामध्ये आंदोलन होत राहिले आहे. दारूबंदीसाठी राजकीय व सामाजिक संघटना एकत्र येऊन संघर्ष नावाची संस्था स्थापन केली. आणि त्या अनुषंगाने संघर्ष संस्थेच्या माध्यमातून चळवळ उभी राहिली. या चळवळीचा इतिहास प्रचंड मोठा असून या माध्यमातून येथे दारूच्या दुकानांवर सातत्याने बंदीची मागणी होत आली.

खारघरमध्ये आतापर्यंत तीन हॉटेलला परवानगी मिळाली आहे. त्यामध्ये स्वतःला फोर स्टार समजणारे एक हॉटेल, निरसुख पॅलेस, जेजे रसोई यांनाच त्या ठिकाणी परवानगी मिळाली आणि तीसुद्धा कायद्याच्या पळवाटा शोधूनच त्या ठिकाणी त्यांनी परवानगी मिळवली. या सगळ्या विरोधात सातत्याने खारघरच्या नागरिकांनी संघर्ष केलेला आहे. त्यामुळे आता ज्या वेळेला एक वाईन शॉप हे थेट मुंबईतल्या परवानगी शिफ्ट करून खारघरमधील मोठ्या व मुख्य रस्त्यावर देण्यात आले, त्यामुळे लोकांच्या भावनांचा कडेलोट झालेला आहे. जर एखाद्या शहरातली लोकं ही दारूबंदी मागतात, मात्र केवळ कायद्यातल्या पळवाटा का दाखवल्या जातात, असा सवाल करत दारूबंदीसाठी योग्य ती कार्यवाही झाली पाहिजे आणि या संदर्भातील प्रक्रिया करण्यासाठी शासनाने पाठिंबा द्यावा, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी लक्षवेधी सूचनेतून केली. **(पान २ वर..)**

## मराठीतील पत्रांना आता मराठीतूनच उत्तर मिळणार!

### केंद्रीय गृह मंत्रालयाचा मोठा निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्रीय गृह मंत्रालयाच्या कामकाजात मोठा बदल करण्यात आला आहे. आता मराठी भाषेत पाठवलेल्या पत्रांना मराठीतूनच उत्तर दिले जाणार आहे. संसदीय राजभाषा समितीच्या बैठकीत ही माहिती समितीचे निमंत्रक खासदार डॉ. दिनेश शर्मा यांनी दिली.

संसदीय राजभाषा समितीच्या नऊ सदस्यांनी मंगळवारी (दि. ८) समितीचे निमंत्रक खासदार डॉ. दिनेश शर्मा (उ.प्र.) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची राजभवन येथे भेट घेतली व समितीच्या मुंबई दौऱ्याबाबत माहिती दिली. देशातील प्रादेशिक भाषांना चालना देणे व हिंदी भाषेला सहयोगी भाषा म्हणून प्रस्थापित करणे या उद्देशाने समिती काम करीत असल्याचे निमंत्रक डॉ. दिनेश शर्मा यांनी या वेळी सांगितले.

केंद्रीय गृह मंत्रालयातील संपूर्ण कामकाज आज हिंदी भाषेत होत असून यानंतर मराठी भाषेतील पत्रांना मराठी भाषेतूनच उत्तर देण्यात येईल, तामिळ भाषेतील पत्रांना तामिळ भाषेतूनच उत्तर दिले जाईल, असे डॉ. शर्मा यांनी सांगितले.

राज्यातील विद्यापीठांचे कुलपती या नात्याने आपण विद्यापीठांमध्ये जर्मन, जपानी, मँडरिन आदी विदेशी भाषादेखील शिकविल्या जाव्या, अशा सूचना विद्यापीठांना केल्या असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

या भेटीवेळी समितीचे सदस्य खासदार रामचंद्र जांगडा (हरियाणा), खासदार राजेश वर्मा (बिहार), खासदार कृतिदेवी देवबर्मन (त्रिपुरा), खासदार किशोरीलाल शर्मा (उत्तर प्रदेश), खासदार सतपाल ब्रह्मचारी (हरियाणा), खासदार डॉ. अजित गोपछडे (महाराष्ट्र), खासदार विश्वेश्वर हेगडे (कर्नाटक) तसेच अधिकारी उपस्थित होते.

## मराठीवरून मीरा रोडमध्ये मोर्चा

**मीरा रोड :** मीरा रोड येथे मराठीच्या मुद्द्यावरून मंगळवारी (दि. ८) मनसेकडून मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चाला उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेनेदेखील पाठिंबा दिला. मोर्चात मंत्री तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे समर्थक प्रताप सरनाईक यांनीही सहभाग घेण्याचा प्रयत्न केला, मात्र आंदोलकांनी घोषणा देत बाटली अंगावर फेकल्याने ते निघून गेले.

मीरा भाईंदरमध्ये मराठी बोलण्यावरून काही दिवसांपूर्वी व्यापारी संघटनांनी दुकाने बंद ठेवून मोर्चा काढत आंदोलन केले होते. त्यानंतर मंगळवारी हा मोर्चा निघाला. दरम्यान, या मोर्चावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कोणत्याही पक्षाला मोर्चा काढायचा असेल आणि परवानगी हवी असेल तर मिळेल, मात्र मोर्चासाठी हाच मार्ग हवा ही मागणी करत असाल, तर राज्यात कायदा आणि सुव्यवस्था बिघडेल. असा प्रयत्न जाणीवपूर्वक होत असेल, तर ते योग्य नाही. शेवटी आपल्या सर्वांना एकाच राज्यात राहायचे आहे.

## ई-सिगारेट विक्री आणि जवळ बाळगणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई होणार -मुख्यमंत्री

**मुंबई :** राज्यात ई-सिगारेटच्या विक्रीवर बंदी आणण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे केली. त्या अनुषंगाने ई-सिगारेट विक्री करणाऱ्यावर तसेच जवळ बाळगणाऱ्यांवर इलेक्ट्रॉनिक्स सिगारेट प्रतिबंध अधिनियम २०१९ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लेखी स्वरूपात दिले.





राज्य शासनाने सन २०१९मध्ये ई-सिगारेटची विक्री, साठवणूक आणि जाहिरातीवर बंदी घातली असतानासुद्धा राज्यात मोठ्या प्रमाणात ठिकठिकाणी ई-सिगारेटची विक्री होत असल्याचे मे २०२५मध्ये निदर्शनास आले आहे. ई-सिगारेटची विक्री व जाहिरातींमुळे मोठ्या प्रमाणात विशेषतः विद्यार्थी, युवती व युवकांमध्ये व्यसनांचे प्रमाण वाढून त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होत आहे. या प्रकरणांकडे संबंधित अधिकाऱ्यांचे योग्य नियोजनाअभावी दुर्लक्ष होत असून या प्रकरणी शासनाने चौकशी करून ई-सिगारेटच्या विक्रीला आळा बसविण्याबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाखल केला होता. **(पान २ वर..)**

## निवडक

### स्कूल बस आणि ट्रेनची धडक, दोन विद्यार्थी ठार

**चेन्नई :** तामिळनाडूच्या कडलूर जिल्ह्यातील सेम्मानकुप्पम गावात मंगळवारी (दि. ८) सकाळी एक स्कूल बस रेल्वे फाटक ओलांडत असताना रेल्वेगाडीची जोरदार धडक बसली. यात दोन विद्यार्थ्यांचा जागीच मृत्यू झाला, तर दोघे गंभीर जखमी झाले. हा अपघात इतका भीषण होता की, व्हॅन सुमारे ५० मीटरपर्यंत फरफटत गेली. जखमी विद्यार्थ्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### भारत बंदमध्ये 'बीएमएस' सहभागी होणार नाही

**नवी दिल्ली :** देशातील १० कामगार संघटनांनी ९ जुलै रोजी भारत बंदची हाक दिली आहे. दरम्यान, सरकारने सन २०१९ व २०२०मध्ये नवे चार लेबर कोड्स लागू केले होते, जे २९ जुन्या कायद्यांऐवजी राबवले गेले. या कोड्समध्ये अनेक सुधारणा करण्यात आल्या असून काही सकारात्मक बाबींचाही समावेश आहे. त्यामुळे आपण या बंदमध्ये सहभागी होणार नसल्याचे भारतीय मजदूर संघाने म्हटले आहे. **(सविस्तर वृत्त पान ३ वर..)**

## भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी घेतली राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डांची भेट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मंगळवारी (दि. ८) नवी दिल्लीत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांची सदिच्छा भेट घेतली. प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर त्यांची नड्डा यांच्यासोबतची ही पहिलीच भेट आहे.

दिल्ली दौऱ्यात भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. यानंतर पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांनाही ते भेटले व चर्चा केली. संघटना वाढीसाठी गडकरी व नड्डांकडून चव्हाण यांनी मार्गदर्शन घेतले.



नड्डा यांच्यासोबतच्या भेटीनंतर चव्हाण यांनी एक्स पोस्टमध्ये म्हटले की, नवी दिल्ली येथे केंद्रीय आरोग्यमंत्री व भाजप राष्ट्रीय अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा यांची स्नेहभेट घेतली. या भेटीमध्ये महाराष्ट्रातील पक्ष संघटना आणखी बळकट करण्यासोबतच विविध विषयांवर चर्चा झाली. नड्डाजींसोबतच्या चर्चेतून नेहमीच एक नवीन ऊर्जा व दिशा मिळते. याचा आजही अनुभव आला. त्याचप्रमाणे गेल्या २५ वर्षांच्या वाटचालीत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे अमूल्य मार्गदर्शन व अपार स्नेह लाभला, असेही प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी नमूद केले आहे.

## माथेरान घाटात कार अपघातात पाच पर्यटक जखमी

**माथेरान, नेरळ : प्रतिनिधी**

माथेरान घाटात थार गाडीचा अपघात ताजा असतानाच येथे हैदराबादवरून आलेल्या पर्यटकांच्या कारचे ब्रेक फेल झाल्याने मंगळवारी (दि. ८) अपघात घडला. यामध्ये पाच प्रवासी जखमी झाले असून एक सुखरूप आहे.

पर्यटकांची इर्टिगा कार जुमापट्टी रेल्वेस्थानकापुढील रेल्वे क्रॉसिंग मार्गावर घाट उतरत असताना लोखंडी सुरक्षा रेलिंगला धडकली आणि थेट रस्त्याच्या खालच्या वळणावर हवेत उडून सिमेंट सुरक्षा कठड्याला धडकली. या वेळी कारच्या एअर बॅग उघडल्याने वाहनातील पर्यटक बचावले. जखमींमध्ये दोन मुले व तीन मुलींचा समावेश आहे. **(सविस्तर वृत्त पान ५ वर..)**



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, व्हाईस चेअरमन अॅड. भगीरथ शिंदे, संघटक डॉ. अनिल पाटील, सहसचिव शिवलिंग मेनकुदळे, बी.एन. पवार, आश्रमशाळा विभागाचे प्रकल्प अधिकारी राजेंद्र काकुळते यांनी संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची मंगळवारी सदिच्छा भेट घेतली. या वेळी रायगड विभागीय पीआरओ बाळासाहेब कारंडे, कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी उपस्थित होते.**

## सरपंचपदासाठी १५ जुलैला नव्याने आरक्षण सोडत


**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंचपदांचे यापूर्वी काढलेले आरक्षण रद्द करून नव्याने आरक्षण काढण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत. त्यानुसार रायगड जिल्ह्यातील ८१० ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठी नव्याने आरक्षण सोडत काढली जाणार आहे. यासाठी जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांना १५ जुलै रोजी विशेष सभा घेण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

रायगडातील ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाच्या आरक्षणाची सोडत यापूर्वी २२ एप्रिल रोजी काढण्यात आली होती. त्या वेळी अनेक वादाचे मुद्दे उपस्थित झाले. आरक्षण सोडत प्रक्रियेवर सर्वच राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आक्षेप घेतल्याने सोडत थांबवण्याची वेळ प्रशासनावर आली. आता पुन्हा नव्याने सोडत काढून आरक्षण निश्चित करण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत.







# आरक्षणाचा लाभ अनुसूचित जातीतील अधिक गरजू युवकांना घेऊ द्यावा -राज्यपाल राधाकृष्णन



**मुंबई, : रामप्रहर वृत्त**

अनुसूचित जातीतील अधिकाधिक विद्यार्थ्यांनी आता गुणवत्तेवर प्रवेश तसेच नोकऱ्या मिळवण्याचा प्रयत्न करावा व आरक्षणाचा लाभ अनुसूचित जातीतील अधिक गरजू युवकांना घेऊ द्यावा, असे आवाहन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा ८० वा वर्धापन दिन राज्यपाल राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे साजरा करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन म्हणाले की, पीपल्स एज्युकेशन सोसायटी शैक्षणिक संस्था व वसतिगृहे निर्माण करून लाखो विद्यार्थ्यांना ज्ञानदान करण्याचे कार्य करीत असल्याबद्दल संस्थेचे अभिनंदन करताना आज अनुसूचित जातीतील अनेक विद्यार्थी आपल्या गुणवत्तेवर वैद्यकीय तसेच अभियांत्रिकी अभ्यासक्रमांना प्रवेश मिळवत आहे. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न देखील हेच होते, असे सांगून आरक्षण ही विकासाची किल्ली आहे, मात्र विद्यार्थी व युवकांनी आता जागतिक स्तरावर स्पर्धेसाठी तयार राहिले पाहिजे. सन २०४७ पर्यंत देश विकसित भारत म्हणून उदयास येईल व डॉ आंबेडकर यांचे स्वप्न साकार होईल, असा विश्वास राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी व्यक्त केला.

यावेळी राज्यपालांच्या हस्ते संस्थेचे दोन माजी विद्यार्थी – राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील तसेच सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांसह विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २० व्यक्तींना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार प्रदान करण्यात आले.

या संस्थेने स्वायत्त विद्यापीठ होण्याचा प्रस्ताव सादर करावा, अशी सूचना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली. पीपल्स एज्युकेशन सोसायटी स्वायत्त विद्यापीठ झाल्यास संस्थेला नवनवीन अभ्यासक्रम राबविता येतील असे सांगून मंत्री श्री. पाटील यांनी संस्थेच्या विकासासाठी शासनाच्यावतीने सहकार्याची ग्वाही दिली.

सामाजिक न्याय विभागामार्फत राज्यात १२० आधुनिक विद्यार्थ्यांची वसतिगृहे उभारण्याचा मानस सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाठ यांनी व्यक्त केला. त्याचप्रमाणे, भीमा कोरेगावला १०० कोटींचा निधी, महाडच्या ऐतिहासिक चौदार तळासाठी १० कोटी रुपये मंजूर करण्यात आले असल्याची माहिती त्यांनी दिली. छत्रपती संभाजीनगर ही डॉ.बाबासाहेत आंबेडकर यांची कर्मभूमी होती. पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या मिलिंद महाविद्यालयाचे आपण माजी विद्यार्थी होतो असे सांगितले.

केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले व संस्थेचे विश्वस्त ॲड. उज्वल निकम यांनी देखील यावेळी उपस्थितांना संबोधित केले.यावेळी राज्यपालांच्या हस्ते ज्येष्ठ अभिनेते भाऊ कदम, अभिनेत्री क्रांती रेडकर, भदंत डॉ. राहुल बोधी, दक्षिण कोरिया येथील धम्मदीप भंते, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळणकर, ॲड. सुरेंद्र तावडे, बळीराम गायकवाड यांना देखील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## राज्यांतर्गत पीक स्पर्धा; जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन

**रायगड : प्रतिनिधी**

अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पीक स्पर्धा सन २०२५-२६ साठी राज्यस्तरावरून कृषी विभागामार्फत पीकस्पर्धा जाहीर करण्यात आल्या असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी पीकस्पर्धेमध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन उपसंचालक कृषी (माहिती) कृषी आयुक्तालय, पुणे यांनी केले आहे.

राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छाशक्ती मनोबल यांमध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने नवनवीन अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल. त्या अनुषंगाने अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पीकस्पर्धा सन २०२५-२६ साठी राज्यस्तरावरून कृषी विभागामार्फत पीकस्पर्धा जाहीर करण्यात आल्या असून त्याच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना कृषी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी तालुकास्तरावरील पिकस्पर्धेमध्ये सहभाग घेऊन शेतकऱ्यांची आलेली उत्पादकता आधारभूत धरून राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील स्पर्धेसाठी विजेत्या शेतकऱ्यांची निवड करण्यात येणार आहे. या स्पर्धेअंतर्गत खरीप (११) व रब्बी (०५) हंगामातील एकूण १६ पिकांसाठी स्पर्धा घेतली जाणार असून, तालुका, जिल्हा व राज्य या तीन स्तरांवर स्पर्धकांची निवड होणार आहे.

पीक स्पर्धेतील पिके : खरीप पिके:-भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमुग, सुर्यफुल, रब्बी पीके:- ज्वारी, गहू, हरभरा,करडई, जवस (एकूण ०५ पिके)

अर्ज दाखल करण्याची अंतीम तारीख : ३१ ऑगस्ट २०२५. रब्बी हंगाम: ३१ डिसेंबर २०२५.

पीक स्पर्धा विजेते- सर्वसाधारण व आदिवासी गट बक्षिसाचे स्वरूप-तालुका पातळी, पहिले बक्षिस रु.५ हजार,दुसरे बक्षिस रु.३ हजार, तिसरे बक्षिस रु.२ हजार. जिल्हा पातळी पहिले बक्षिस रु.१० हजार,दुसरे बक्षिस रु.७ हजार, तिसरे बक्षिस रु.५ हजार. राज्य पातळी पहिले बक्षिस रु.५० हजार,दुसरे बक्षिस रु.४० हजार, तिसरे बक्षिस रु.३० हजार.

## तळा एसटी बसस्थानक कात टाकणार

**तळा : प्रतिनिधी**

बसस्थानकाच्या कामाला सुरुवात झाली असून आता तळा बसस्थानक कात टाकत आहे.बऱ्याच कालावधी नंतर अखेर बसस्थानकाच्या कामाला मुहूर्त मिळाला आहे.



बसस्थानकाच्या काँक्रीटीकरणाच्या कामाला सुरुवात करण्यात आली. अंतर्गत भागाचे कॉक्रीटी करणं होत आहे.गेल्या कित्येक वर्षांपासून रखडलेलेल्या तळा बसस्थानकाच्या कामामुळे येथील नागरिकांसह प्रवाशांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत होते.याभागातील उंचसखलपणा व पावसाळ्यात खड्डे यामुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत होता. त्यातून आता प्रवासी व नागरिकांची सुटका होणार आहे.बसस्थानकाची झालेली दुरावस्था, मुतारी तुंबल्यामुळे सर्वत्र पसरलेली दुर्गंधी तसेच खडकाळ व ओबडधोबड जागेमुळे बस लावताना चालकाला येणाऱ्या अडचणी याचा विचार होऊन अखेर या कामाला मंजुरी मिळाल्याने १४ ऑक्टोबर २०२४ रोजी मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते ऑनलाइन पध्दतीने या कामाचे भूमिपूजन झाले होते.

# संपकाळातील सुरळीत वीजपुरवठ्यासाठी महावितरण सज्ज

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महावितरणच्या २३ पैकी ६ कर्मचारी संघटनांनी बुधवारी (दि. ९) एका दिवसाचा संप पुकारला आहे. या संपकाळात वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणकडून आपत्कालिन नियोजन पूर्ण झाले राज्यभरातील यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.

नागरिकांनी वीजपुरवठ्याबाबत कोणत्याही नकारात्मक व चुकीच्या संदेशावर विश्वास ठेवू नये. वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी पर्यायी यंत्रणा २४ तास युद्धपातळीवर सज्ज राहणार आहे. वीजपुरवठ्याबाबत काही तक्रारी किंवा शंका असल्यास २४ तास सुरु असलेल्या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा व संपाच्या कालावधीत सहकार्य करावे असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

राज्यातील वीज कर्मचाऱ्यांच्या सहा संघटनांच्या संयुक्त कृती समितीने राज्यपातळीवरील विविध मागण्यांसाठी बुधवारी (दि. ९) २४ तासांचा संप जाहीर केला होता. हा संप होऊ नये यासाठी कृती समितीमधील संघटनांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसोबत दोन वेळा बैठक झाली. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र व संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी प्रमुख मागण्यांबाबत बैठकीत सकारात्मक प्रतिसाद दिला. वीज ग्राहकांची गैरसोय होऊ नये यासाठी संप टाळण्याचे आवाहन केले.

आपत्कालिन नियोजन व पर्यायी मनुष्यबळ उपलब्ध- या २४ तासांच्या संप काळासाठी महावितरणकडून आपत्कालीन व्यवस्था उभारण्यात आली आहे. यामध्ये मुख्यालय व क्षेत्रीय परिमंडल कार्यालयांमध्ये स्वतंत्र नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आले आहेत. दर तासाला राज्यातील वीजपुरवठ्याची स्थिती वरिष्ठ अधिकारी व मुख्यालयास कळविण्यात येणार आहे.

संपकाळात प्राधान्याने सुरळीत वीजपुरवठ्यासाठी पर्यायी मनुष्यबळ उपलब्ध करण्यात येत असून संपात सहभागी नसलेले महावितरणचे कर्मचारी, बाह्य स्त्रोत कर्मचारी, महावितरणच्या निवड सूचीवरील कंत्राटदार व कर्मचारी यांची सुरळीत वीजपुरवठ्यासाठी स्थानिक कार्यालय, उपकेंद्र आदी ठिकाणी तात्पुरत्या नियुक्ती करण्यात आली आहे. आवश्यकतेनुसार बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांच्या कंत्राटदारांना अतिरिक्त मनुष्यबळाची मागणी करण्यात आली आहे. या सर्वांसाठी वाहन व्यवस्था व इतर सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. याबाबतच्या लेखी सूचना क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आल्या आहेत.

संपकाळामध्ये सुरळीत वीजपुरवठ्यासाठी सर्व क्षेत्रीय विभाग कार्यालयांच्या निवडसूचीवर असलेल्या सर्व कंत्राटदारांना आवश्यक साधनसामुग्री, मनुष्यबळ व वाहनांसह संबधीत कार्यालयांमध्ये उपलब्ध राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सोबतच महावितरणकडून वितरण रोहीत्र, ऑईल, वीजतारा, केबल्स, वीजखांब, फिडर पिलर्स, डिस्ट्रीब्यूशन बॉक्सेस, वाहतुकीसाठी वाहने आदी आवश्यक साधनसामुग्री महावितरणच्या विविध कार्यालयांमध्ये उपलब्ध ठेवण्यात आली आहे. यासह गंभीर कारणास्तव घेतलेल्या रजा वगळून इतर अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बुधवारच्या (दि. ९) रजा रद्द करण्यात आल्या आहेत.

घरगुतीसह अत्यावश्यक क्षेत्रात वीजपुरवठ्याची खबरदारी- संपकाळात प्रामुख्याने घरगुती ग्राहकांसह पाणी पुरवठा योजना, रुग्णालये, मोबाईल टॉवर्स, शासकीय कार्यालये आदींचा वीजपुरवठा सुरळीत ठेवण्याची विशेष खबरदारी घेण्यात येत आहे. ज्या ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला त्या ठिकाणी सर्वप्रथम पर्यायी व्यवस्थेतून (बॅकफिड) वीजपुरवठा सुरू करण्यात येईल.

## खोपोली रोटरी, इनरव्हील क्लबकडून विविध सामाजिक उपक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

रोटरी क्लब खोपोली व इनरव्हील क्लब कडून विविध सामाजिक उपक्रम संपन्न झाले.यात डॉक्टरांचा सत्कार, वारकरी बंधूंना आरोग्य किट चे वाटप व खोपोली शहरातील विविध भागांत वृक्ष लागवड आदी उपक्रम राबविण्यात आले . रोटरी क्लब खोपोलीच्या अध्यक्ष सुनीता चव्हाण,सेक्रेटरी डॉ नलिनी रामस्वामी यांच्या हस्ते डॉ हर्षल जाधव, डॉ रवींद्र टिळक, डॉ रश्मी टिळक यांच्या सत्कार करण्यात आला. खोपोली नगरपरिषद व खोपोली तर्फे काजूवाडी येथील पाण्याच्या टाकी जवळ




वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी ६०० विविध प्रकारची झाडे लावण्यात आली. या कार्यक्रमात मुख्याधिकारी डॉ पंकज पाटील व नगरपालिका कर्मचारी , इनरव्हिल क्लब खोपोली अध्यक्ष दिना शहा,सेक्रेटरी मधुमिता पाटील, माझी अध्यक्ष जयश्री कलोशी,खजिनदार दीपिका कोठारी, ज्येष्ठ मेंबर सुमित्रा महर्षी व नवीन सदस्य तारा उपस्थित होते.

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर खालापूर तालुक्यातील वारकरी संप्रदायातील ४०० वारकऱ्यांना इनरव्हील क्लब खोपोली तर्फे मेडिकल पाउच देण्यात आले. खालापूर तालुक्यातील ४०० वारकरी तानाजी महाराज कर्णुक महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली एकादशी निमित्य पंढरपूर येथे बसने जातात. त्या सर्व ४०० वारकऱ्यांना इनरव्हील क्लब खोपोली तर्फे मेडिकल पाउच,बिस्कीट, इलेक्ट्रिक पाकीट देण्यात आले. ह्या गाड्या मुळगाव, साजगाव, सावरोली,खालापूर, बिड , पळसदरी इथून निघाल्या होत्या. यावेळी क्लबच्या अध्यक्ष दिना शहा, सेक्रेटरी मधुमिता पाटील,माजी अध्यक्ष जयश्री कलोसी, दीपिका कोठारी व सर्व सदस्य उपस्थित होत्या.

## अनुकंपा तत्वावर १८ जणांना मिळाली पालिकेची नोकरी



**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या आस्थापनेवर अनुकंपा तत्वावर नियुक्तीकरिता गट ड ची अधिसंख्य पदे निर्माण करण्यास शासन मान्यता लाभली आहे. त्यानुसार महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आज १८ उमेदवारांना शिपाई या पदावर अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार, शहर अभियंता शिरीष आरदवाड यांच्या हस्ते अनुकंपा तत्वावर नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.

यावेळी नवनियुक्त कर्मचा-यांना मार्गदर्शन करतांना अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी आपल्या दिवंगत कुटूबियांचे वारस म्हणून आपल्याला मिळालेली अनुकंपा तत्वावरील नोकरी, ते सोबत नसण्याचे दु:ख आणि त्यांचे वारस म्हणून मिळालेली संधी अशा संमिश्र भावनंची असून सर्वांना भूषणावह वाटेल असे काम करावे असे मत व्यक्त केले. शिपाई म्हणून रुजू झाला असलात तरी चांगले काम करुन व आपली शैक्षणिक पात्रता उंचावून लिपीक म्हणून बढती मिळेल असे काम करा अशा शब्दात त्यांनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी विशाल सुरेश साळुंखे, सुगंधा भरत तातळे, उमेश विठ्ठल मस्तद, प्रशांत जयप्रकाश सुर्वे, आकाश प्रदीप पाटील, सलमान मुस्तफा पिंजारी, आकाश प्रेमनाथ निकम, ज्ञानदेव राजेंद्र भवारी, सौरभ उत्तम चव्हाण, रोनित संतोष नाईक, सुनिता ज्ञानेश्वर पवार, हर्षल विनायक ठोंबरे, मंगला सुरेंद्रसिंग राठोड, हेमंत विष्णु गावित, शुभांगी विनायक पवार, मानसी गणेश सकपाळ, सुनिता जगदीश घरत, मेघा चंद्रकांत नलावडे या १८ जणांना अनुकंपा तत्वावर शिपाई पदाची नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.

पान १ वरून

## विहित प्रक्रियेनुसार निवेदन प्राप्त झाल्यास योग्य ती कार्यवाही -उपमुख्यमंत्री पवार

सन २००८ व २००९च्या अधिसूचनेनुसार नगर परिषद/महानगरपालिका क्षेत्रातील एखाद्या प्रभागातील २५ टक्केपेक्षा कमी नसलेल्या महिला मतदार किंवा एकूण मतदारांनी लेखी निवेदन दिल्यास संबंधित जिल्हाधिकारी यथास्थिती गुप्त पद्धतीने मतदान घेण्याची प्रक्रिया पूर्ण करतील. जर संबंधित प्रभागातील एकूण मतदार किंवा महिला मतदारांच्या संख्येच्या किमान ५० टक्केपेक्षा अधिक अनुक्रमे एकूण मतदार किंवा महिला मतदार यांनी मद्य विक्रीची अनुज्ञप्ती बंद करण्याच्या बाजूने मतदान केल्यास त्या क्षेत्रात मद्यविक्री अनुज्ञप्ती बंद करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात येतात, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले.

ग्रामपंचायतीचे नगरपालिकेत किंवा महानगरपालिकेत रूपांतर झाल्यानंतर अनुज्ञप्तीसंदर्भात कोणती कार्यवाही करावी या संदर्भात शासनाने वेळोवेळी नियमांमध्ये बदल केले आहेत. १९७२पासून राज्यात नवीन अनुज्ञप्तीची परवानगी देण्यात येत नाही. तथापि, विहित कार्यपद्धतीनुसार एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित करण्यास परवानगी देण्यात येते. मद्य विक्रीची अनुज्ञप्ती बंद करण्यासंदर्भात नगरपालिका किंवा महानगरपालिकेतील उपस्थित नागरिकांच्या नव्हे; तर एकूण मतदारांच्या ५० टक्केपेक्षा अधिक अनुक्रमे एकूण मतदार किंवा महिला मतदारांचा निर्णय विचारात घेतला जाईल, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभा सदस्य अभिमन्यू पवार यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यास उत्तर देताना स्पष्ट केले.

## ई-सिगारेट विक्री, जवळ बाळगणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई होणार -मुख्यमंत्री

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रश्नावर दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले की, राज्यात विनाधूर ई-सिगारेटबाबत इलेक्ट्रॉनिक्स सिगारेट प्रतिबंध (उत्पादन, निर्मिती, आयात, निर्यात, वाहतुक, विक्री, वितरण, साठा आणि जाहिरात) अधिनियम २०१९ या कायद्यानुसार कारवाई करण्यात येते. या कायद्यांतर्गत राज्यात मे २०२५मध्ये मुंबई शहर, नागपूर शहर, पिंपरी-चिंचवड व ठाणे शहर या पोलीस आयुक्तालयांतर्गत एकूण ११ गुन्हे दाखल असून १५.४७ लक्ष रुपये इतक्या किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अधिनियमातील कलम ४ व ५मधील तरतूदीनुसार ई-सिगारेटच्या उत्पादन, आयात, निर्यात, वाहतूक, विक्री, वितरण, साठवणूक व जाहिरातीवर बंदी घालण्यात आली आहे. ई-सिगारेटला आळा बसविण्याकरिता विविध कार्यक्रमांचे तसेच पथनाट्यांचे आयोजन करण्यात येऊन त्याद्वारे ई-सिगारेटमुळे आरोग्यास होणाऱ्या नुकसानीबाबत राज्यातील नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येते. शाळा व महाविद्यालयात प्रत्यक्ष भेटी देऊन पोलीस दिदी, पोलीस अधिकारी यांच्यामार्फत ई-सिगारेट व्यसनांपासून होणाऱ्या दुष्परिणामांबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात येते तसेच मोहल्ला कमिटी, पोलीस मित्र, आईज ॲण्ड इअर यांच्या सभासदांसमवेत पोलीस ठाणे स्तरावर वेळोवेळी याबाबत बैठका आयोजित करण्यात येतात. या कायद्यांतर्गत राज्यात सन २०२१ ते २०२५ (मे अखेरपर्यंत) या कालावधीत एकूण २४७ गुन्हे दाखल असून सुमारे चार कोटी ३३ लक्ष इतक्या किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

भविष्यात राज्यातील विविध पोलीस घटकांतर्गत विविध पोलीस ठाणे हद्दीत ई-सिगारेट विक्री करताना, जवळ बाळगताना मिळून आल्यास इलेक्ट्रॉनिक्स सिगारेट प्रतिबंध (उत्पादन, निर्मिती, आयात, निर्यात, वाहतुक, विक्री, वितरण, साठा आणि जाहिरात) अधिनियम २०१९ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लेखी उत्तरात म्हटले आहे.

# खारघरमध्ये एका रात्रीत नऊ फ्लॅटमध्ये घरफोडी

## भयमुक्तीसाठी पोलिसांनी सहकार्याची भूमिका घ्यावी; गृहखात्याने लक्ष देण्याची आमदार प्रशांत ठाकूर यांची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चोरी आणि घरफोडीच्या अनुषंगाने लोकांना भयमुक्त करण्याची गरज आहे; अन्यथा पोलिसांवरील विश्वास उडेल. ते पाहता गृहखात्याने लक्ष द्यावे, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधानसभेत केली. विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात २०२५-२६ गृह विभागाच्या पुरवणी मागणीच्या अनुषंगाने बोलताना खारघरमध्ये एका रात्रीत नऊ घरात झालेल्या चोरीसंदर्भात पोलिसांकडून नागरिकांना होणाऱ्या वागणुकीचा दाखला देत आमदार प्रशांत ठाकूर यांनी चिंता व्यक्त केली.

या वेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले की, पनवेल परिसरात लोकवस्ती मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. या वाढत्या लोकवस्तीमध्ये कायदा सुव्यवस्थेच्या बाबतीमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. विशेषत्वाने खारघर सारखे शहर आहे जे सर्व अत्याधुनिक सोयीसुविधायुक्त आहे, मात्र कायदा सुव्यवस्थेच्या अनुषंगाने अलिकडे वारंवार चिंताजनक प्रकार त्या ठिकाणी घडत आहेत. एका रात्रीत खारघर वास्तुविहारमधील संस्कृती सोसायटीतील पाच आणि पारिजात सोसायटीतील चार घरांमध्ये अशा एकूण नऊ ठिकाणी घरफोडी झाल्या आहेत. पोलिसांनी हे सर्व गुन्हे एकत्रितपणे नोंद करून घेतले आहेत.

पोलिसांकडे तक्रार केल्यानंतर त्या ठिकाणी व्यवस्थित उत्तरे दिली जात नाहीत. त्यामुळे याचा तपास कशा प्रकारे तपास केला जाणार असा नागरिकांमध्ये संभ्रम आहे. पोलिसांकडून तक्रारदारांना योग्य उत्तर दिली जात नाहीत. मनुष्यबळ कमी आहे, सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत असे तक्रारदारांना सांगितले जाते. विशेष म्हणजे सीसीटीव्ही कॅमेरामध्ये गुन्हेगार कॅप्चर झाले आहेत. त्यामुळे या गुन्हेगारांच्या शोधासाठी काय केले जात आहे याची माहिती पोलिसांनी तक्रादारांशी समन्वय करून दिली पाहिजे. सुरक्षा रक्षक सर्व ठिकाणी आहेत. त्यांच्या बैठका झाल्या पाहिजेत तसेच भीती मुक्ततेसाठी पोलिसांनी नागरिकांना आश्वस्त केले पाहिजे आणि त्यासाठी गृह विभागाने लक्ष द्यावे, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात बोलताना केली.

### रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण

खारघर शहरात एकाच रात्री नऊ ठिकाणी घरे फोडून चोरट्यांनी लाखोंचे दागिने आणि रोख रक्कम लंपास केली आहे. खारघर वास्तूविहार सेक्टर १६ येथील संस्कृती को. ऑप. हौ. सोसायटी या ठिकाणी बंद असणाऱ्या पाच घरामध्ये तसेच पारिजात को. ऑप हौ.सोसायटी या ठिकाणी चार घरांमध्ये ३ जुलै रोजी मध्यरात्री ३च्या सुमारास घरफोडी करण्यात आल्या आहेत. घरफोडी करण्यात आलेली बहुतांशी घरे बंद होती. विशेष म्हणजे चोरट्यांचा या ठिकाणी सर्रास वावर दिसत असल्याने रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या परिसरात वारंवार घरफोड्या होत असताना पोलीस करतात काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# भारतीय मजदूर संघ आजच्या देशव्यापी संपात सहभागी नाही

**उरण : रामप्रहर वृत्त**

९ जुलै २०२५ रोजी काही ट्रेड युनियन संघटनांनी देशभरात संपाची हाक दिली आहे, मात्र भारतीय मजदूर संघ (बीएमएस)ने या संपात सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी स्पष्ट केले की, हा संप मुख्यतः लेबर कोड्स विरोधात असून, त्यांचा त्यात सहभाग नाही.

सरकारने २०१९ व २०२० मध्ये नव्या चार लेबर कोड्स लागू केले होते, जे २९ जुन्या कायद्यांच्या ऐवजी राबवले गेले. या कोड्समध्ये अनेक सुधारणा करण्यात आल्या असून काही सकारात्मक बाबींचाही समावेश आहे. उदाहरणार्थ, Social Security Code २०२० अंतर्गत ESIC (कर्मचारी राज्य विमा महामंडळ) मधून आता ज्या कामगारांचे योगदान संस्थेकडून भरले जात नाही, अशांनाही उपचार मिळणार आहेत.

बीएमएसने यापूर्वी दोन कोड्स – Code on Wages २०१९ आणि Code on Social Security २०२० – यांना आपला पाठिंबा दिला असून इतर दोन कोड्स – Industrial Relations Code आणि Occupational Safety, Health Working Conditions Code – यामध्ये सुधारणा व्हाव्यात, अशी शिफारस केली आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, सरकारने या विषयावर अनेक ट्रेड युनियन्स आणि कामगार संघटनांशी संवाद साधला असला तरी निर्णय अद्याप अपूर्ण आहे. त्यामुळे सरकारने लवकरात लवकर सर्व कोड्समध्ये आवश्यक सुधारणा कराव्यात, अशी मागणी बीएमएसने केली आहे.

बीएमएसने स्पष्टपणे म्हटले आहे की, ९ जुलै २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या या संपाला ते पाठिंबा देणार नाहीत आणि त्यांच्या सर्व युनियन्सनीही या संपात सहभागी न होण्याचे आवाहन केले आहे. अशी माहिती भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील यांनी दिली.

भारतीय मजदूर संघ ही संघटना एक जबाबदार संघटना म्हणून काम करते. त्यामुळे कोणत्याही प्रकारे या संपात सहभागी ही संघटना होणार नसल्याचे संघाच्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे जाहीर करण्यात आले आहे.

# सीए ओरिएंटेशन कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन

**खारघर : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मंगळवारी (दि.८) वाणिज्य विभाग व रोटरी क्लब खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी सी ए ओरिएंटेशन प्रोग्रामचे आयोजन केले होते.

रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींचा बँकेच्या परीक्षांमध्ये यश संपादन करण्याचा टक्का वाढत आहे त्यामध्ये प्रामुख्याने सीए, आयबीपीएस, सी एम ए, तसेच वेगवेगळ्या बँकेच्या इतर परीक्षांचा समावेश आहे याचाच भाग म्हणून महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी सीए ओरिएंटेशन प्रोग्रामचे आयोजन केले होते यासाठी डॉ. सीए विजय नारायण केवलरमानी व रोटरी क्लब खारघर चे अध्यक्ष डॉ. रवी किरण यांनी विद्यार्थ्यांना सीए परीक्षेतील बारकावे, सीए फाउंडेशन व इंटरमीडिएटचा सिल्याबस, परीक्षेची तयारी कशी करायची याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी विद्यार्थ्यांना या सत्रासाठी शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शन केले. या ओरिएंटेशनचे आयोजन प्रा. विशाल देशमुख वाणिज्य विभाग प्रमुख यांनी केले तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. राहुल कांबळे, प्रा. तनुजा सुमन, प्रा. प्रमोद वाघे आदींनी सहकार्य केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवराज देवरा व समता सलते यांनी केले तसेच मुस्कान वालीलकर हिने कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांचे आभार मानले.



**पनवेल : भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र राज्य परिषद सदस्यपदी अरुणशेठ भगत यांची निवड झाली आहे. अरुणशेठ भगत यांनी गेल्या अनेक वर्षांपासून पक्षाच्या निष्ठावान, जागरूक आणि कार्यक्षम कार्यकर्त्यापासून ते एक प्रेरणादायी नेतृत्व असा प्रवास केला आहे. स्थानिक पातळीवर समाजाशी असलेला थेट संवाद, कार्यकर्त्यांशी सुसंवाद, आणि जनतेच्या प्रश्नांवर दिलखुलास भूमिका हे त्यांच्या नेतृत्वाचे खास वैशिष्ट्य ठरले आहे. त्यांच्या या निवडीमुळे पक्षाला एक सशक्त, विचारशील आणि कार्यक्षम प्रतिनिधी लाभला असून महाराष्ट्रातील सामाजिक आणि राजकीय कार्यक्षेत्रात नवा विश्वास आणि नवी ऊर्जा निर्माण झाली आहे. दरम्यान, निवड झाल्याबद्दल भाजपचे माजी तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन अरुणशेठ भगत यांचे अभिनंदन केले. त्यांच्यासह पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, राम पाटील, युवा नेते शुभ पाटील, सुबोध ठाकूर, अनिल कोकाटे आदींनी अरुणशेठ भगत यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

# पनवेलमध्ये हिवताप प्रतिरोध महिन्यांतर्गत जनजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



सध्या जोरदार पाऊस सुरू असून या दिवसांमध्ये डासांचे प्रमाण वाढत असते. त्यामुळे हिवताप, डेंगू, मलेरिया सारख्या साथजन्य रोग होण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवरती वैद्यकिय आरोग्य विभागामार्फत किटकजन्य आजराविषयी खबरदारी घेण्यासाठी वैद्यकिय आरोग्य विभागामार्फत विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात येत आहे. महापालिकेने दिलेल्या सूचनांचे पालन करुन नागरिकांनी पुरेशी घ्यावी, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी केले आहे.

सध्या महापालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागाच्यावतीने हिवताप प्रतिरोध महिना साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गत शाळा, घरोघरी जाऊन, आरोग्य केंद्राच्या आसपासचा परिसर, बाजारपेठा, सोसायट्यांमध्ये हिवतापाची लक्षणे, उपचार व हिवताप प्रतिरोध अंतर्गत विविध उपाययोजनांची माहिती देण्यात येत आहे.

पावसाळ्यात विविध किटकजन्य रोगाचे प्रमाण वाढत असते. अशा वेळी नागरिकांनी पिण्याचे पाणी उकळून प्यावे. तसेच भाज्या, फळे इत्यादी वस्तू स्वच्छ धुवून मगच खाण्यासाठी वापराव्यात. सर्व केरकचरा घंटा गाडीतच टाकावा. घर व सभोवतालचा परिसर जास्तीत जास्त स्वच्छ ठेवावा. आपल्या इमारतीतील पाण्याची टाकी निर्जंतुक करावी. साचलेले पाणी, डबकी यातील पाणी वाट काढून वाहून जाईल अशी सोय करावी जेणे करून डास उत्पन्न होणार नाहीत. शिळे व उघड्यावरचे अन्न खाऊ नये, विहरीचे पाणी शुध्दीकरण करूनच पिण्यास वापरावे. अतिसार झाल्यास क्षार संजिवनी मिश्रणाचा वापर करावा. घरांतर्गत डास उत्पत्तीस्थाने टाळण्यासाठी घरातील फुलदाणी मनीप्लँट, वॉटरकूलर इत्यादीमधील पाणी आठवड्यातून एक दिवस पुर्णपणे काढून कोरडे करून 'कोरडा दिवस' पाळावा, अशा सूचना वैद्यकिय आरोग्य विभागाचे मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी केले आहे.

जेवणापूर्वी व शौचास जाऊन आल्यानंतर हात साबणाने स्वच्छ धुणे, पुर्ण शिजवेले, ताजे अन्न खावे, रस्त्यांवरील उघडे अन्नपदार्थ खावू नये. ताप सर्दी, खोकला अशा प्रकारची लक्षणेअसल्यास नजिकच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा.

हिवताप, डेंगू, मेंदूज्वर, चिकनगुनिया, मलेरिया असे साथीचे रूग्ण आपल्या आसपास आढल्यास जवळच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी किंवा रूग्णालयाशी संपर्क साधावा. रूग्णालयांनी, प्रयोगशाळांनी साथीच्या रोगाचे रूग्ण महापालिकेला idsppanvelcorporation@gmail.com या ईमेलआयडीवरती कळवावे असे आवाहन वैद्यकिय आरोग्य विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

# कोळखे सरपंचपदी मिनल म्हात्रे पुन्हा विराजमान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल तालुक्यातील कोळखे ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी भाजपच्या मिनल रोहन म्हात्रे पुन्हा विराजमान झाल्या आहेत. त्यांचा सरपंचपदाचा कार्यभार काढून घेण्याच्या कोकण विभागीय आयुक्तांच्या निर्णयाला राज्याचे ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी स्थगिती दिली आहे.

या संदर्भात ग्रामविकास व पंचायतराज मंत्रालय यांच्या न्यायालयात नुकतीच व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे सुनावणी झाली. या वेळी वकील, अधिकाऱ्यांनी म्हणणे मांडले. वस्तुस्थिती विचारात घेता कोकण विभागीय आयुक्तांच्या निर्णयाला पुढील सुनावणीपर्यंत तात्पुरती स्थगिती देण्यात येत आहे, असे ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी आपल्या आदेशात नमूद केले आहे.

# हुतात्मा हिरवे गुरुजी शाळेत साहित्य वाटप



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पत्रकार क्लबच्या माध्यमातून पनवेल महापालिकेच्या हुतात्मा हिरवे गुरुजी शाळेतील विद्यार्थ्यांना आज दिनांक ८ जुलै रोजी 'शालेय शैक्षणिक साहित्य' वाटप करण्यात आले. पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'ड' च्या प्रभाग अधिकारी सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम घेण्यात आला.

या वेळी पनवेल तालुका पत्रकार प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे उपाध्यक्ष तृप्ती पालकर खजिनदार राकेश पितळे, ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी संजय कदम सुमंत नलावडे, अनिल भोळे, राजेंद्र पाटील, वर्षा कुलकर्णी व इतर मान्यवर उपस्थित होते. या वेळी सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने म्हणाल्या माझेही शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले आहे. त्यामुळे या शाळांशी माझे भावनिक नाते आहे. महापालिकेच्या दगडी शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी खूप कष्ट घेत आहेत. पनवेल तालुका पत्रकार क्लबच्या माध्यमातून स्तुत्य उपक्रम राबविला आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा.

या कार्यक्रमाची सुरूवात विद्यार्थ्यांच्या स्वागत गीताने करण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सुजीत म्हात्रे यांनी सर्वांचे स्वागत करून, शाळेतील विद्यार्थ्यांनी केलेली प्रगती विषयक माहिती दिली.

पनवेल तालुका पत्रकार क्लबच्या माध्यमातून देण्यात आलेल्या शैक्षणिक साहित्यचा शाळेतील विद्यार्थ्यांना उपयोगी पडणार असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपशिक्षक वैभव पाटील यांनी केले. यावेळी शाळेतील शिक्षकवर्ग कमल तायडे, वैशाली सावळे, अर्चना माने, स्वाती पाटील उपस्थित होते.

# आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा

## जि.प.च्या खारघर, कोपरा, मुर्बी शाळांमध्ये उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**





पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या कोशिश फाऊंडेशन आणि पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेच्या वर्ग अंतर्गत फेऱ्या स्पर्धा प्रमुख मयुरेश नेतकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषदेच्या खारघर, कोपरा, मुर्बी शाळांमध्ये झाल्या.

या वेळी भाजपचे खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, नरेश ठाकूर, गुरुनाथ गायकर, अनिता पाटील, नेत्रा पाटील, आरती नवघरे, वासुदेव पाटील, शहर सरचिटणीस दीपक शिंदे, समीर कदम, जिल्हा महिला मोर्चा सरचिटणीस संध्या शारबिद्रे, दत्ता ठाकूर, किर्ती नवघरे, अमर उपाध्याय, महिला मोर्चा शहराध्यक्ष साधना पवार, फुलाजी ठाकूर, युवा मोर्चा शहराध्यक्ष नितेश पाटील, अक्षय लोखंडे, प्रवीण बेरा, आदित्य हातगे, हार्दिक पटेल, प्रथम पाटील, सार्थक दोरुगडे, मयूर घरत, योगेश पाटील, राहुल शिंदे, अनिकेत पाटील, ध्रुव गजरा, दिपक ठाकूर, वनिता शिर्के, स्नेहल सावंत, सुनील बाटगेरी आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर आत्मविश्वासाने भाषणे सादर केली. माझं शाळा, माझं स्वप्न, शिक्षणाचं महत्त्व, स्वच्छ भारत यांसारख्या विषयांवर विद्यार्थ्यांनी स्वतःचे विचार प्रभावीपणे मांडले. स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांमध्ये प्रेझेंटेशन स्किल्स, संवाद कौशल्य, आणि व्यासपीठावर आत्मविश्वासाने बोलण्याची क्षमता विकसित होत आहे. ग्रामीण भागातील व शासकीय शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी अशा स्पर्धा म्हणजे स्वतःला व्यक्त करण्याची अमूल्य संधी ठरते. मुख्याध्यापकांनीही स्पर्धा शाळेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरत असल्याचे सांगितले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत तयारीस विशेष वेळ दिला.

कोशिश फाउंडेशनच्या पुढाकाराने व पनवेल मनपाच्या सहकार्याने शासकीय शाळांमध्येही अशा उपक्रमांची रचना होणे ही शिक्षण क्षेत्रासाठी एक सकारात्मक पायरी आहे. स्पर्धा विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांना चालना देणारी ठरत आहे. पुढील आंतरशालेय फेरीसाठी विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार असून विजेत्यांना पुढील टप्प्यांत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

**वक्तृत्व स्पर्धा म्हणजे विचार मांडण्याची, आत्मविश्वास वाढवण्याची संधी असून व्यासपीठावर बोलताना भीती कमी होते. भाषा कौशल्य, मुद्देसूद विचार मांडणे, योग्य शब्द निवडणे शिकायला मिळते. इतर स्पर्धकांचे भाषण ऐकून नवीन दृष्टिकोन समजतात. वक्तृत्वामुळे सामाजिक भान निर्माण होते. त्यामुळे ही स्पर्धा विद्यार्थ्यांच्या कौशल्यात भर टाकणारी आहे.**

**–प्रवीण पाटील, अध्यक्ष, भाजप खारघर मंडळ**

## संपादकीय

# दुर्बुद्धीचा नसता ताप

आजही देशाच्या जीडीपीमध्ये सर्वात जास्त योगदान महाराष्ट्राचेच आहे. देशाच्या इतिहासात आणि वर्तमानातही मराठी माणसाचे योगदान कोणीच नाकारू शकत नाही आणि जर कोणी ते नाकारत असेल तर ते अत्यंत चुकीचे आहे. खासदार निशिकांत दुबे यांच्या वादग्रस्त विधानावरची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ही प्रतिक्रिया त्यांना सडेतोड उत्तर देणारी आहे, पण त्या वादग्रस्त विधानाने मराठी लोकांना डिवचल्याचा लाभ बहुदा मनसेच्या मोर्चाला झाला असावा.

**पहिलीपासून हिंदी शिकवण्याच्या मुद्याला हिंदीसक्तीचा रंग देऊन विरोधकांनी राज्यात वातावरण तापवले. त्याची परिणती मिरा-भाईंदर परिसरात मनसे कार्यकर्त्यांनी मराठीत बोलण्याचा आग्रह करीत एका व्यापाऱ्याला मारहाण करण्यात झाली. मनसेकडून परप्रांतियांना केल्या जाणाऱ्या मारहाणीच्या निषेधार्थ मिरा-भाईंदरमधील व्यापाऱ्यांकडून गुरुवारी आंदोलन करण्यात आले. भविष्यातही मराठीत बोलण्यावरून परप्रांतियांना अशी मारहाण होऊ शकते अशी चिंता व्यक्त करीत व्यापाऱ्यांनी सुरक्षेच्या मुद्यावर आंदोलन केले. व्यापाऱ्यांच्या सुरक्षेकरिता उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी पोलिसांकडे केली. या आंदोलनातून अमराठी व्यापारी व मनसे हा वाद आणखी चिघळला आणि स्थानिक मनसे नेत्याने ८ तारखेला मोर्चा काढणार असल्याचे जाहीर केले. एकुणात मनसेला मराठी विरुद्ध अमराठी हा मुद्दा पेटवत ठेवायचा होता हे उघडच होते. मग मोठ्या संख्येने जाऊन उपायुक्तांना ८ तारखेला मोर्चा काढणार असल्याचे निवेदन दिले गेले. या वादात नंतर मराठी एकीकरण समितीनेही उडी घेतली. महाराष्ट्रात मराठी भाषेचा आग्रह करणे चुकीचे नाही, परंतु भाषेवरून मारहाण करणे मात्र चुकीचे आहे अशी भूमिका या वादावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रारंभीच घेतली. कुणाही सुजाण, सुसंस्कृत नागरिकाला ही भूमिका पटेल अशीच आहे. भाषेवरून कुणी गुंडागर्दी केली तर कठोर कारवाई केली जाईल असा इशारा सरकारकडून देण्यात आला. भाषेचा खरा अभिमान असणाऱ्यांनी मराठी भाषा शिकवण्यासाठी क्लास सुरू करावेत. आपल्या मुलांना मराठी शाळेत टाकावे असा सल्लाही मुख्यमंत्र्यांनी दिला. व्यापाऱ्यांनी मराठी माणसाच्या विरोधात नव्हे तर जे अशा प्रकारची दादागिरी करतात त्याविरोधात मोर्चा काढला हे भाजपचे स्थानिक आमदार नरेंद्र मेहता यांनीही स्पष्ट केले व महाराष्ट्र व मराठीबाबत आम्हाला अभिमानच आहे अशी ठाम भूमिकाही त्यांनी घेतली. परंतु त्यानंतर सुशील केडिया नामक व्यावसायिकाने राज ठाकरेंचा निषेध करीत केलेली 'तुमच्यासारखे लोक आहेत तोवर मराठी शिकणार नाही' ही एक्सवरची पोस्ट वातावरण आणखी तापण्यास कारणीभूत ठरली आणि पाठोपाठ झारखंडमधून लोकसभेवर निवडून गेलेले भाजप खासदार निशिकांत दुबे यांना देखील दुर्दैवाने महाराष्ट्राविषयी वादग्रस्त विधान करण्याची दुर्बुद्धी झाली. त्या वादग्रस्त विधानामुळे मराठीजनांच्या भावना दुखावणे स्वाभाविक होते. 'मराठी लोक आमच्या पैशावर जगत आहेत' या त्यांच्या विधानाने वातावरण आणखी बिघडवण्याचे काम तेवढे केले. मुंबई आणि महाराष्ट्र सगळ्यांना खुल्या मनाने सामावून घेत असल्यामुळेच वर्षानुवर्षे देशभरातून लोक येथे उपजीविकेसाठी येत आले आहेत याकडे त्यांनी दुर्दैवाने पूर्ण दुर्लक्ष केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुबे यांचे हे बोलणे योग्य नसल्याचे मत ताबडतोब नोंदवले. कायदा व सुव्यवस्था बिघडू नये म्हणून पोलिसांनी मनसेच्या मोर्चाला विशिष्ट मार्गावर परवानगी नाकारली. पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तामुळे अखेर मोर्चा शांततेत पार पडला. आता तरी हा अकारण उद्भवलेला मराठी विरुद्ध अमराठी वाद शमावा.**

# सायबर स्कॅमचे धोके ओळखा आणि यापासून दूर राहा

आपण सध्या रोज सायबर स्कॅममुळे लाखो रुपयांची फसवणुक झाल्याच्या बातम्या ऐकत असतो. यामध्ये ज्येष्ठ नागरिकांची संख्या जास्त आहे. म्हणुनच सायबर स्कॅम ओळखा आणि यापासून दूर राहा-

०१) जर तुम्हाला ट्राय (टेलिफोन ऍथॉरिटी) कडून तुमचा फोन कसा डिस्कनेक्ट करणार आहे याबद्दल सांगितले गेले, तर प्रतिसाद देऊ नका. हा स्कॅम आहे.

०२) जर तुम्हाला फेडएक्सने पॅकेजबद्दल बोलावले आणि मोबाईलवर १, ९ किंवा काहीही बटण दाबण्यास सांगितले, तर दाबू नका. तुमचा फोन हॅक होऊ शकणारा हा स्कॅम आहे.

०३) जर एखादा पोलीस अधिकारी तुम्हाला फोन करून तुमच्या आधार कार्डबद्दल बोलत असेल, तर प्रतिसाद देऊ नका. पोलिसांतर्फे असे कधीही कॉल वर विचारले जात नाही. हा स्कॅम आहे.

०४) जर ते तुम्हाला सांगत असतील की तुम्ही 'डिजिटल अरेस्ट' मध्ये आहात, आणि कुणालाही कॉल करू नका, जिथे आहात तिथून हलू नका पुढचे ४८ तास ! तर याला प्रतिसाद देऊ नका. हा स्कॅम आहे.

०५) जर ते तुम्हाला सांगत असतील की तुमच्यासाठी पाठवलेल्या किंवा तुम्ही पाठवलेल्या एखाद्या पॅकेजमध्ये ड्रग्ज सापडली आहेत, तर प्रतिसाद देऊ नका. हा स्कॅम आहे. (लक्षात ठेवा... कर नाही तर डर कशाची) हे विसरू नका !

०६) जर ते म्हणाले की तुमचा मुलगा/मुलगी ऍक्सीडेन्ट मध्ये सापडला असून आता आमच्या हॉस्पिटल मध्ये आहे, पंधरा मिनिटात ऑपरेशन करावे लागेल, तर तोवर टोकन मनी म्हणून अमुक इतके पैसे पाठवा ! तर अजिबात पाठवू नका ! हा स्कॅम आहे. त्यासाठी आधी मुलाला कॉल करून खात्री करून घ्या. मग कळेल की तो तर ऑल रेडी सेफ आहे... कॉलेजात / कँटीन मध्ये !

०७) जर ते तुमच्याशी व्हॉट्सअँप किंवा एसएमएसद्वारे संपर्क साधत असतील, तर प्रतिसाद देऊ नका. हा स्कॅम आहे. (शक्यतो अननोन नम्बरवरून आलेले कोणतेही कॉल अटेंड करू नका ! व्हिडीओ कॉल तर मुळीच करू नका अटेंड !

०८) जर कोणी तुम्हाला फोन करून सांगितले की त्यांनी चुकून तुमच्या यू.पी.आय. आयडीवर पैसे पाठवले आहेत आणि त्यांना फक्त त्यांचे पैसे परत हवे आहेत, तर प्रतिसाद देऊ नका. हा स्कॅम आहे. तुमच्याकडे ते शंभर रुपये पाठवतील आणि लिंक अथवा क्यू आर कोड देतील आणि सांगतील की इथे रिटर्न करा ! ते अजिबात करू नका ! त्यातून तुमचा फोन हॅक करून तुमचे अकाउंट रिकामे करण्याचा हा स्कॅम आहे !

०९) जर कोणी तुमची गाडी किंवा तुमचे वॉशिंग मशिन किंवा तुमचा सोफा विकत घ्यायचा आहे असे म्हणत असेल आणि ते लष्कर किंवा सी. आर.पी.एफ. चे आहेत असे म्हणत असेल आणि तुम्हाला त्यांचे ओळखपत्र दाखवले तर प्रतिसाद देऊ नका. हा स्कॅम आहे.

१०) जर कोणी म्हणत असेल की ते स्विगी किंवा झोमॅटोवरून फोन करत आहेत आणि तुम्हाला १ किंवा इतर कोणताही नंबर काहीही दाबून तुमच्या पत्त्याची पुष्टी करण्याची आवश्यकता असेल तर प्रतिसाद देऊ नका. हा स्कॅम आहे.

११) जर ते तुम्हाला फक्त ऑर्डर रद्द करण्यासाठी किंवा प्रवासासाठी किंवा जे काही करण्यासाठी ओ.टी.पी. शेयर करण्यास सांगत असतील, तर प्रतिसाद देऊ नका. हा स्कॅम आहे.

१२) व्हिडिओ मोडवर कोणत्याही कॉलला कधीही उत्तर देऊ नका. त्यासाठी वाटलं तर अशावेळी तुमच्या मोबाईलचा स्क्रीन छताकडे धरून पहा. समोरून कोण कसल्या अवस्थेत (न्यूड टाईप) बोलत असेल तर तुम्हाला ते दिसेल पण त्यांना तुम्ही दिसणार नाही त्यामुळे नंतर होणारे इमोशनल ब्लॅक मेल थांबेल ! नंतर त्या नंबरला लगेच ब्लॉक करा !

१३) तरी गडबडीत तुम्ही त्याला रीस्पॉन्ड केला जरी तरी आणि तो गोंधळ झाल्यास फक्त तो नंबर ब्लॉक करा. आणि थोडा वेळ तुमचा मोबाईल बंद ठेवा.

१४) निळ्या रंगात लिहिलेल्या कोणत्याही लिंकवर कधीही घाईघाईत क्लिक करू नका ! पाठवणारा माहितीतील आहे का ते आधी चेक करा नाहीतर सरळ तो मेसेज डिलीट करून त्या नंबरला ब्लॉक करा

१५) जरी सी.बी.आय., ई.डी., आय.टी. विभागाकडून नोटीस पाठवली आहे असं कॉल/मेसेज करून सांगितलं असलं तरी पॅनिक होऊ नका ! कारण या विभागातर्फे असे कधीही कॉल/मेसेज करून नोटीस पाठवली जात नाही. अधिकृत पोस्टातर्फे तरी येते किंवा त्यांची माणसे फिजिकली नोटीस घेऊन येतात. हे विसरू नका !

१६) अशी पत्रे सरकारी पोर्टल्समधून आली आहेत का ते नेहमी तपासा कारण अनेकदा खाजगी कुरियर तर्फे हि येतात जी डुप्लिकेट असतात. सरकारी नोटीस कधीही खाजगी कुरियर कडून येत नाही.

१७) जर कोणी तुम्हाला उप-समन्स असे सांगत फोन करत असेल आणि तुम्हाला येऊन ते गोळा करावे लागेल किंवा ते पाहण्यासाठी तुम्हाला पैसे द्यावे लागतील, तर त्याला/तिला समन्स किंवा खटल्याच्या फाईलवर संबोधित करण्यासाठी न्यायालयाच्या प्रोसेस सर्व्हरद्वारे किंवा नोंदणीकृत पोस्टद्वारे पाठविण्यास सांगा. जर ते तुम्हाला धमकावत असतील, तर त्या व्यक्तीचा वेळ वाया घालवा. तसेच न्यायाधीशाचे नाव, न्यायालयीन खोली क्रमांक आणि मजला आणि/किंवा इमारत क्रमांक विचारा-जर ती व्यक्ती सांगू शकत नसेल, तर याचा अर्थ असा आहे की हा एक खात्रीलायक स्कॅम आहे.

१८,) जर कोणी फोन करून म्हणतो की तो/ती पोलिस ठाण्यातून फोन करत आहे आणि तुम्हाला बोलावले जात आहे, तर त्याला/तिला ते स्थानिक पोलिस ठाण्यात पाठवण्यास सांगा (तुमचे ठिकाण/शहर उघड करू नका) आणि स्थानिक पोलिस स्टेशनला ते तुम्हाला देऊ द्या.

२०) क्रेडिट/डेबिट/आधार कार्ड क्रमांक, सीव्हीव्ही, मुदत संपण्याची तारीख यासह कोणत्याही डेबिट/क्रेडिट/रुपे कार्ड तपशीलासह कोणालाही कधीही देऊ नका !

२०) ट्रूकॉलर मिळवा. स्पॅम किंवा फसवणूक असे चिन्ह असलेले कॉल उचलू नका. या श्रेणीत येणारे सर्व कॉल ब्लॉक करा.

२१) तुमचे बाबा/आई म्हणाली म्हणून आणि त्यांनी सांगितले म्हणून मी तुम्हाला इतकी आणि इतकी रक्कम पाठवली आहे,. चेक करून सांगा अशी माहिती देणारे कोणतेही कॉल डिस्कनेक्ट करा. तुम्हाला पैसे पाठवत असलेल्या खऱ्या व्यक्तीला फोन करा आणि खात्री करा. मात्र, त्यांनी एखादी लिंक पाठवली असेल तर त्यावर अजिबात क्लिक करू नका किंवा क्यू.आर. कोड स्कॅन करू नका किंवा ओ.टी.पी. शेअर करू नका.

२२) कोणी प्रिय व्यक्ती/नातेवाईक/मित्राला आपत्कालीन/आजारपण/अपघाताची माहिती देण्यासाठी फोन केल्यास, पैसे पाठवण्यास/जमा करण्यास सांगत असल्यास तसे काहीही करू नका. प्रिय व्यक्ती/नातेवाईक/मित्र/त्यांच्या कुटुंबियांना स्वतः थेट फोन करा आणि खात्री करा. जर त्या व्यक्तीपर्यंत पोहोचता येत नसेल, तर स्वतः गुगल करा आणि रुग्णालयाला फोन करा व चौकशी करा.

२३) शेयर्स किंवा क्रिप्टोकरन्सी खरेदी करण्याचा सल्ला देणाऱ्या कोणत्याही कॉल/संदेशांना प्रतिसाद देऊ नका. असा साठा खरेदी करू नका कारण निश्चित नफा अपेक्षित आहे. जो तुम्हाला भासवला जातो पण रियल मध्ये कधीही तो तुम्हाला मिळत नाही.

२४) वर्क फ्रॉम होम करण्याचे आश्वासन देणाऱ्या कॉल/संदेशांना शक्यतो प्रतिसाद देऊ नका. ते तुम्हाला जाळ्यात अडकवतात, तुम्हाला नफा दर्शविताना गुंतवणुकीसाठी पैसे पाठवतात. कधीही नफा मिळत नाही. हा स्कॅम आहे.

२५) जर तुम्हाला एखाद्या प्रिय व्यक्तीचा/नातेवाईक/मित्राचा वेदनादायक आवाज ऐकू आला, मदत मागत असेल तर पॅनिक होऊन लगेच घराबाहेर पडू नका. खास करून रात्रीच्या वेळी. बाहेर कोण आहे याचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न करा. प्रिय व्यक्ती/नातेवाईक/मित्राच्या मोबाईलवर/घरी फोन करा. गरज भासल्यास पोलिसांना बोलवा. कारण असं इमोशनली गुंतवून बाहेर बोलावून लुटण्याचा हा स्कॅम आहे.

२६) 'सोप्या कर्जाच्या' ॲप्सच्या जाळ्यात अडकू नका. अनेक कर्जे घेण्यासाठी ते हळूहळू तुम्हाला फसवतात. तुमची गुंतवणूक नष्ट होईल परंतु कर्ज व व्याज भरण्यासाठी तुम्ही जबाबदार असाल.

लक्षात ठेवा की सायबर भामट्याकडून कधीही काहीही मोफत मिळत नाही. तुम्ही अमली पदार्थ/बंदी घातलेली औषधे/बनावट पारपत्र/बेकायदेशीर शस्त्रे आणि दारूगोळा/मानवी तस्करी किंवा मनी लॉन्ड्रिंगसारख्या इतर गुन्ह्यांचा व्यवहार करत नसाल तर तुम्हाला घाबरण्याची गरज नाही! ! काहीही घडो... मन शांत ठेवा, पॅनिक होऊ नका ! तुम्ही पॅनिक झालात की त्या भामट्याचे काम निम्मे सोपे होते मग हिप्नोटाईज पद्धतीने ते तुम्हाला गोंधळून टाकतात आणि लुटतात.

**-डॉ. धनंजय देशपांडे**



## बदलते तंत्रज्ञान

### बाईक व स्कूटरमध्ये अँटी-लॉक ब्रेकिंग सिस्टम

केंद्र सरकारने १ जानेवारीपासून भारतात उत्पादित होणाऱ्या एंट्री-लेव्हल दुचाकी वाहनांसाठी अँटी-लॉक ब्रेकिंग सिस्टम असणे अनिवार्य केले आहे. यामध्ये इलेक्ट्रिक बाइक्स आणि स्कूटरचाही समावेश आहे. हे वैशिष्ट्य अचानक ब्रेक लावल्यास वाहन घसरण्यापासून रोखते.रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने एक अधिसूचना जारी केली आहे ज्यामध्ये ऑटोमेकर्सना सर्व दुचाकींमध्ये एबीएस द्यावे लागेल असे म्हटले आहे. यापूर्वी हा नियम १२५ सीसी इंजिन आणि त्याहून अधिक क्षमतेच्या दुचाकींसाठी अनिवार्य होता.



तथापि, ५० सीसी मोटर आणि ५० किमी प्रतितास पेक्षा कमी वेग असलेल्या ईव्हींना यातून सूट देण्यात आली आहे. इतकेच नाही तर, प्रत्येक दुचाकीसोबत, डीलरला दोन बीआयएस-प्रमाणित हेल्मेट (एक स्वारासाठी आणि एक मागे बसलेल्या व्यक्तीसाठी) देखील द्यावे लागतील.

मोटारसायकल आणि स्कूटरमुळे होणारे अपघात कमी करणे हे सरकारचे एबीएस अनिवार्य करण्याचे उद्दिष्ट आहे. देशात रस्ते अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्या दुचाकीस्वारांची संख्या दरवर्षी सतत वाढत आहे.

अँटी-लॉक ब्रेकिंग सिस्टम ही एक अशी तंत्रज्ञान आहे जी अचानक ब्रेक लावल्यास बाईक किंवा स्कूटरची चाके लॉक होण्यापासून रोखते.समजा तुम्ही खूप वेगाने गाडी चालवत आहात आणि अचानक तुमच्या समोरून एखादी व्यक्ती किंवा वाहन आले तर तुम्ही अचानक ब्रेक लावला तर एबीएस नसलेल्या बाईकचे चाक लॉक होऊ शकते, ज्यामुळे बाईक घसरू शकते आणि अपघात होऊ शकतो. या परिस्थितीत, एबीएस वारंवार ब्रेक चालू आणि बंद करते जेणेकरून चाक लॉक होणार नाही आणि तुम्ही बाईक नियंत्रित करू शकाल. अभ्यासानुसार, एबीएस अपघातांची शक्यता ३५-४५% ने कमी करू शकते. ही तंत्रज्ञान विशेषतः पावसात किंवा निसरड्या रस्त्यांवर जीव वाचवू शकते.सध्या, लहान बाइक्समध्ये बहुतेक कॉम्बी-ब्रेकिंग सिस्टम (सीबीएस) असते, जी दोन्ही ब्रेक एकत्र वापरते, परंतु ते एबीएसइतके प्रभावी नाही. नवीन नियमानुसार, प्रत्येक नवीन दुचाकी, मग ती बाईक १०० सीसी असो किंवा ५०० सीसी, मध्ये एबीएस असणे आवश्यक आहे.

# आदर्श लोकप्रतिनिधी रामभाऊ म्हाळगी

रामचंद्र काशीनाथ म्हाळगी ऊर्फ रामभाऊ म्हाळगी हे आरएसएसचे प्रचारक होते. साधारणपणे १९५२ -५३ च्या सुमारास ते राजकारणात आले. सुरुवातीला भारतीय जनसंघ अर्थात आताचे भाजपच्या संघटनाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली. त्यांनी भारतीय जनसंघाच्या प्रचारासाठी आणि संघटात्मक बांधणीसाठी महाराष्ट्रभर प्रवास केला. आत रामभाऊ म्हाळगी यांचा जन्मदिन आहे.



## निमित्त

रामभाऊ म्हाळगी यांचा जन्म ९ जुलै १९२१ रोजी पुणे जिल्ह्यातील कुडूस गावामध्ये झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण जन्मगावी कुडूसमध्ये, तर माध्यमिक शिक्षण पुण्यात झाले. रामभाऊ विद्यार्थी दशेतच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संपर्कात आले. मद्रास व सोलापूर येथे त्यांनी संघ प्रचारक म्हणून काम केले. येथूनच त्यांच्या सार्वजनिक जीवनाला एका अर्थाने प्रारंभ झाला. पुढे त्यांनी गोवा विमोचन समितीच्या कार्यकारी समितीचे सचिव, संयुक्त महाराष्ट्र समितीच्या जनरल काउन्सिलचे सदस्य, महाराष्ट्र दुष्काळ निवारण समितीच्या जनरल काउन्सिलचे सदस्य म्हणूनही काम केले.

जनसंघाची स्थापना झाल्यावर महाराष्ट्राच्या विधानसभेत निवडून जाणारे ते पहिलेच आमदार होते. पुढे ते आपल्या कार्याच्या जोरावर जनसंघचे प्रदेशाध्यक्ष देखील बनले. त्यांची जडणघडणच संघाच्या मुशीत झाले. त्यांच्यावर विद्यार्थी दशेतच संघाचे संस्कार झाले. महाराष्ट्रात संघाची विचारसरणी रुजवण्यात रामभाऊ म्हाळगींचा सिंहाचा वाटा होता. त्यांच्या ठाई असलेली अभ्यासू वृत्ती. सुसंस्कृतपणा व साधेपणामुळे त्यांना जनसंघाचे द्रोणाचर्य म्हणून ओळखले जायचे. सत्तरच्या दशकात जनसंघाचे केवळ चारच आमदार विधानसभेत होते. त्यामध्ये रामभाऊ म्हाळगी यांचा समावेश होतो. जनसंघाचे जरी चारच आमदार असले तरी देखील रामभाऊ म्हाळगी यांचा त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणामुळे विधनसभेत मोठा दबदबा होता. पुण्याहून निवडून गेलेल्या रामभाऊ म्हाळगी हे बोलू लागले की, सर्व सभागृह शांत असायचे त्यांच्या भाषणात कधीही गोंधळ होत नव्हता.

कुशल संसदपटू आदर्श लोकप्रतिनिधी आणि तळमळीचे सामाजिक कार्यकर्ते यासोबतच संघ प्रचारक म्हणून रामभाऊ म्हाळगी यांना ओळखले जायचे. ते १९५७, १९६७ आणि १९७२ असे तीन वेळा भारतीय जनसंघाकडून विधानसभेत आमदार तर १९७७ व १९८० असे दोन वेळा ठाणे मतदार संघातून लोकसभेचे खासदार म्हणून निवडून गेले. याचसोबत ते मध्य रेल्वे स्टेशन मास्टर्स संघटनेचे उपाध्यक्ष आणि पुणे बार काउंन्सिलचे उपाध्यक्ष देखील होते.

रामभाऊ म्हाळगी हे आरएसएस विचारवंत आणि भाजप नेते दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रभावाखाली होते , ज्यांनी सरकार नेतृत्व इच्छुक आणि भारतातील सध्याच्या सरकार नेत्यांसाठी शिक्षण संस्थेची कल्पना मांडली होती १९८२ मध्ये प्रमोद महाजन यांनी भाईंदरजवळील उत्तन गावात केशव सृष्टी कॅम्पसमध्ये रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी उघडली संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक आणि सामाजिक परिषदेने आरएमपीला विशेष सल्लागार दर्जा दिला आहे. साभार - इंटरनेट

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### कांद्याच्या रसाचे 'हे' आहेत चमत्कारिक फायदे

कांद्याच्या रसाचे आरोग्यासाठी अद्वितीय फायदे: हृदयरोग, मधुमेह आणि कर्करोगाचा धोका कमी अनेक संशोधनांमध्ये, कांद्याचा रस अनेक आरोग्य समस्या दूर करण्यास उपयुक्त असल्याचे म्हटले गेले आहे. खरंतर, कांदा केवळ पोषक तत्वांनीसमृद्ध नसतो, तर त्याचे अँटी-ऑक्सिडंट, अँटी-इंफ्लेमेटरी आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म देखील त्याला एक नैसर्गिक औषध बनवतात.



१. आजारांचा धोका कमी कांद्यामध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन बी६, फोलेट, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि क्वेर्सेटिन आणि ॲलिल प्रोपाइल डायसल्फाइड सारख्या सल्फर संयुगे भरपूर प्रमाणात असतात. कांद्यामध्ये असलेले अँटी-ऑक्सिडंट्स शरीरातील मुक्त रॅडिकल्स नष्ट करतात, ज्यामुळे हृदयरोग, कर्करोग आणि मधुमेह यांसारख्या आजारांचा धोका कमी होतो.

**२. नैसर्गिक डिटॉक्सिफायर**

कांद्याचा रस हा एक नैसर्गिक डिटॉक्सिफायर आहे. तो केवळ पचनसंस्था मजबूत करत नाही तर रक्तातील साखर आणि कोलेस्टेरॉल नियंत्रित करण्यास देखील मदत करतो. तथापि, ते संतुलित प्रमाणात घेणे महत्वाचे आहे.

**३. साखरेची पातळी नियंत्रित करण्यासाठी प्रभावी**

कांद्याचा रस रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यासाठी प्रभावी आहे. कांद्याचा रस मधुमेही रुग्णांमध्ये हायपरग्लाइसेमिया नियंत्रित करण्यास मदत करतो. त्यात असलेले ॲलिल प्रोपाइल डायसल्फाइड इन्सुलिन संवेदनशीलता वाढवते आणि ग्लुकोजची पातळी स्थिर ठेवते.

**४. हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर**

कांद्यामध्ये असलेले क्वेरसेटिन आणि इतर अँटी-ऑक्सिडंट्स हृदयाच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहेत. कांद्याचे नियमित सेवन केल्याने एलडीएल (वाईट) कोलेस्ट्रॉल आणि सिस्टोलिक रक्तदाब कमी होतो, ज्यामुळे हृदयरोगाचा धोका कमी होतो. कांद्याचा रस रक्तातील होमोसिस्टीनची पातळी कमी करतो, जी हृदयाच्या आरोग्यासाठी हानिकारक असू शकते.

५. केस गळणे थांबवण्यास होते मदत कांद्यामध्ये असलेले अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म केस गळणे थांबवतात. स्कॅल्प इन्फेक्शनमुळे केस गळतात. कांद्याच्या रसामध्ये सल्फर असते, जे हा संसर्ग दूर करते आणि केस गळणे थांबवते.

# रायगड जिल्ह्यातील १२ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दलातील कर्मचारयांच्या समुपदेशनाने बदल्या झाल्यानंतर आता अधिकारयांच्याही बदल्या करण्यात आल्या आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे, कर्जतचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्यासह १२ अधिकारयांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. या सर्वांना तातडीने नवीन नेमणूकीच्या ठिकाणी हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

रायगड पोलीसांच्या स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांची श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी म्हणून बदली करण्यात आली आहे. स्थानिक गुन्हे शाखेचा कारभार पहात असताना कर्तव्यात गंभीर स्वरूपाची कसूर केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

खाडे तात्काळ पदभार सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यांच्याजागी नियंत्रण कक्षातील पोलीस निरीक्षक मिलींद खोपडे यांची तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करण्यात आली आहे. कर्जतचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्यावरदेखील कर्तव्य कसुरीचा ठपका ठेवत त्यांची दहशतवाद विरोधी शाखेत बदली करण्यात आली आहे. त्यांच्याकडे गुन्हे शाबिती शाखेचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. गरड यांना परशुराम कांबळे यांच्याकडून तात्काळ पदभार स्वीकारण्याचे आदेश देण्यात आले आहेत. गरड यांच्याजागी नियंत्रण कक्षातील संदीप भोसले यांना कर्जत पोलीस निरीक्षक म्हणून नेमणूक देण्यात आली आहे.

आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांची खोपोली पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी म्हणून बदली करण्यात आली आहे. तर खोपोलीचे पोलीस निरीक्षक शीतल राऊत यांना जिल्हा विशेष शाखेचे प्रभारी म्हणून नेमणूक देण्यात आली आहे. नियंत्रण कक्षातील महिला पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर यांना पाली पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी म्हणून नेमणूक देण्यात आली आहे. तर पालीच्या महिला पोलीस निरीक्षक सरिता चव्हाण यांच्यावर भरोसा सेलची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

गुन्हे शाबिती शाखेचे परशुराम कांबळे यांना मुरूड पोलीस ठाण्याचे प्रभारी म्हणून नियुक्ती देण्यात आली आहे. श्रीवर्धनचे पोलीस निरीक्षक उत्तम रिकामे यांची बदली अर्जशाखेत करण्यात आली आहे. नियंत्रण कक्षातील पोलीस निरीक्षक राजेंद्रकुमार सानप यांच्याकडे आर्थिक गुन्हे शाखेची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. तर नियंत्रण कक्षातील पोलीस निरीक्षक तानाजी नारनवर यांच्याकडे पोलीस उपअधीक्षक मुख्यालय पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. नवीन नेमणूकीच्या ठिकाणी हजर राहण्यासाठी या सर्वांना कार्यमुक्त करण्यात आले आहे.

## चौक ग्रामपंचायत उपसरपंचपदी भाजपच्या पूजा हातमोडे बिनविरोध



**चौक : प्रतिनिधी**

चौक ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी भारतीय जनता पक्षाच्या सौ. पूजा जगदीश हातमोडे यांची बिनविरोध निवड झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

खालापूर तालुक्यातील सर्वात मोठी ग्राम पंचायत म्हणून चौक ग्राम पंचायत हिचा उल्लेख होतो. राजकारण,अर्थकारण आणि विकासाच्या मार्गावर असलेली ही ग्राम पंचायत आहे.उपसरपंच सुभाष पवार यांनी आपल्या उपसरपंच पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या उपसरपंच पदाची निवडणूक सरपंच रितू ठोंबरे यांच्या अध्यक्षतेखाली झाली.१७ सदस्य असलेली ग्राम पंचायत मध्ये पूजा जगदीश हातमोडे यांचा एकमेव उप सरपंच पदाचा अर्ज दाखल झाला. दुपारी निवडणूक निर्णय अधिकारी तथा सरपंच रितू ठोंबरे यांच्या अध्यक्षतेखाली सभा सुरू झाली असता, एकमेव अर्ज आल्याने त्यांना बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले निवडणूक मदतनीस म्हणून ग्रामपंचायत अधिकारी गणेश मोरे यांनी कामकाज पाहिले.

पूजा हातमोडे यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर झाल्यावर फटक्यांची आतिषबाजी करण्यात आली. यावेळी भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, खालापूर मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, ग्रामपंचायत प्रमुख जगदीश हातमोडे, सरपंच सुहास कदम, ज्येष्ठ नेते सुनील गायकवाड, सचिन मते, यांच्यासह अनेक मान्यवर व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की खालील परिशिष्टात नमूद केलेली सामायिक शेतजमिन मिळकत ही मालक **श्री. विजय कृष्णा पाटील व इतर** यांच्याकडून कायमस्वरूपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशील यांनी ठरवलेला आहे व या व्यवहारा संदर्भात जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **श्री. विजय कृष्णा पाटील व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या आशिलांच्या सांगण्यावरून ही वर्तमानपत्रात जाहीर नोटीस देत आहेत.

मिळकतीचे वर्णन मौजेः केळवणे (५५३५०१)
(PU-ID : 33655913326), तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ९१/७ खाते क्रमांक : ५७९ | १ | ०.१९.२० <br> पो.ख. ०.०१.०० <br> **एकुण ०.२०.२०** | ३.०७ |
| **या एकूण विक्री क्षेत्राचे ०.२०.२०** | | | |


वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, इ. संबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसाच्या** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती नसल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरून आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**दिनांक : ०७/०७/२०२५**

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक - ३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड -४१०२०६मो. क्र. ९९२०४७५८०१

## माथेरान घाटात अपघातामध्ये हैदराबादचे पाच पर्यटक जखमी



**नेरळ, माथेरान : प्रतिनिधी**

हैदराबादवरून माथेरान फिरण्यासाठी आलेल्या पर्यटकांच्या अर्टिगा कारचे ब्रेक फेल झाल्याने अपघात झाला आहे. या कारमध्ये सहा प्रवाशी प्रवास करीत होते. त्यातील पाच प्रवाशी जखमी झाले असून एक सुखरूप आहे. जखमींमध्ये दोन तरुण तर तीन तरुणींचा समावेश आहे. जुमापट्टी रेल्वे स्थानकापुढील रेल्वे क्रॉसिंग मार्गावर कार घाट उतरत असताना हा अपघात घडला. कार लोखंडी सुरक्षा रेलिंगला धडकून थेट रस्त्याच्या खालच्या वळणावर हवेत उडून सिमेंट सुरक्षा कठड्याला धडकली. यामध्ये कारचे एयर बॅग उघडल्याने वाहनातील समोरील पर्यटक थोडक्यात जखमी झाले.

हैदराबाद राज्यातील गुंटूर जिल्ह्यातील राहणारे साकेत राम,रेयूत त्रिलोक,काशू तेजस्विनी,रेहुक पूजिता,रेव्ह वैष्णवी,तेजस्वी इम्कोरल ह्या सहा जणांचा एक ग्रुप माथेरान फिरण्यासाठी ४ जुलै रोजी आपल्या अर्टिगा कारमधून निघाले होते. ७ जुलै रोजी परतीच्या प्रवासाला निघाले होते. यामध्ये त्रिलोक हा वाहन चालवत होता.माथेरान घाट उतरत असताना जुमापट्टी या रेल्वेस्थानकाच्या वरील पहिला रेल्वे क्रॉसिंग येथे तीव्र उतारावर वाहनाचे ब्रेक फेल झाल्याने त्रिलोकचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार प्रथम रस्त्याच्या कडेला असणाऱ्या लोखंडी सुरक्षा रेलिंगला धडकली ही धडक एवढी भीषण होती की कार हवेत झेप घेत खालच्या वळणावरील सिमेंट कठड्याला धडकली.यामध्ये सिमेंट कठड्याचे दोन भाग होऊन खोल दरीच्या भागात तुटून पडले.तर कार रस्त्यावर उलटी पडली होती.यावेळी घाटात काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. परंतु अर्धातास अपघात ग्रस्त पर्यटकाना कुठलीही मदतच मिळाली नसल्याचे समोर आले आहे.

नेरळ पोलिस ठाण्याचे पोलिस अधिकारी शिवाजी ढवळे यांना अपघाताची माहिती मिळताच ढवळे घटनास्थळी दाखल झाले .वाहनातील सहाही प्रवासी वाहनात अडकून होते.त्यांना सुखरूप बाहेर काढून रायगड हॉस्पिटल मध्ये तत्काळ उपचारासाठी दाखल केले.हा अपघात एवढा भीषण होता की वाहनातील सुरक्षा एअर बॅग ओपन झाल्या यामुळे चालक आणि समोरील व्यक्ती थोडक्यात बचावले.

## अप्पासाहेब धारकरांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण

**कर्जत : प्रतिनिधी**

माजी उच्च शिक्षणमंत्री व कोकण ज्ञानपीठ संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. प्रभाकर नारायण तथा अप्पासाहेब धारकर यांच्या जयंतीनिमित्त कर्जत तालुक्यातील दहिवली भागात असलेल्या कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षरोपण करण्यात आले. दरवर्षी महाविद्यालयात वृक्षारोपण करण्यात येते. आतापर्यंत तीन हजारच्या वर वृक्षाचे संगोपन करण्यात आले असून या वृक्ष संगोपनाची जबाबदारी विद्यार्थ्यांनी घेतली आहे.

महाविद्यालयामध्ये स्व. अप्पासाहेब धारकर यांना पुष्पमाला अर्पण करून श्रध्दांजली वाहण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे, प्राचार्य डॉ. मोहन काळे, उपप्राचार्य डॉ. अमोल चांदेकर, कार्यालयीन अधीक्षक निकेत मंडावळे, डॉ. निलोफर खान आदी उपस्थित होते.

डॉ. काळे यांनी, आम्ही गेल्या दहा वर्षांपूर्वी वृक्षारोपण करण्याचा संकल्प केला आहे. आत्ता पर्यंत या परिसरात तीन हजार पेक्षा जास्त वृक्ष संगोपन केले आहे. म्हणूनच हा परिसर हिरवागार दिसत आहे. प्रत्येकाने आपली जबाबदारी म्हणून प्रत्येक वर्षी एक झाड लावून त्याचे संगोपन केले पाहिजे, असे सूचित केले. त्यानंतर महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

या प्रसंगी डॉ. अतुल त्रिपाठी, डॉ. सतीश पांडव, प्रा. स्वप्नील फलक, प्रा. निलेश भोंडे, प्रा. अक्षता गीध, प्रा. प्रिया खाते, प्रा. अनिकेत इंदुलकर, प्रा. धनश्री शिंदे, विजय जिनघरे, रेवती देशपांडे, रुपेश पाटील, महेश म्हात्रे, प्रवीण पाटील, नवनाथ शेळके, मयूर कडू, सुहास गुप्ते, निशिकांत मोधळे, विकास फिरके, संजय चौधरी, ममता पाटणकर, सुलभा पाटील, पूनम देशमुख, अर्जुन गोरखा, संजय बांदिवडेकर, ईश्वर मिसाळ आदींसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## पनवेल महानगरपालिका
### ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ | फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२- २७४५५ | आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com | वेबसाईट: www.panvelcorporation.com

सन २०२५-२०२६ करीता पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत महिलांना स्वावलंबी व सशक्त बनवण्यासाठी, त्यांची व्यावसायिक व सामाजिक कौशल्य वाढवण्याच्या उद्देशाने विविध प्रशिक्षण जाणीव व जागृती करणेबाबत व्यावसायिक प्रशिक्षण देणेकरिता खाली नमुद केलेल्या बाबीकरीता बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहे.

**कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाचा कालावधी | प्रती लाभार्थी खर्च रु. |
|---|---|---|---|
| १. | महिला व बालकल्याण विभागामार्फत महिलांना स्वावलंबी व सशक्त बनवण्यासाठी, त्यांची व्यावसायिक व सामाजिक कौशल्ये वाढवण्याच्या उद्देशाने विविध प्रशिक्षण जाणीव व जागृती करणे. <br> **प्रमुख उपक्रम (Activities)-** <br> **१. आरोग्य विषयक जाणीव जागृती-** <br> मासिक पाळी व आरोग्यविषयक जाणीव जागृती, मासिक पाळीच्या अनुषंगाने आधुनिक साधनांचा वापर, कॅन्सर विषयक जनजागृती. <br> **२. योगा, ध्यानधारणा, प्राणायमाचे महत्व व प्रात्यक्षिक-** <br> योगाचा शारीरिक व मानसिक आरोग्यावर प्रभाव, ध्यानधारणेचे मानसिक स्वास्थ्यासाठी महत्त्व, प्राणायामाचा श्वसन व उर्जेवर परिणाम. <br> **३. असंघटित महिलांना लघुउद्योगाचे व रोजगाराचे-** <br> प्रशिक्षण - नवी मुंबई विमानतळ उद्योगाच्या संधी, MIDC, JNPT, Tourism, Hospitality नोकरी व व्यवसाय संधी, सध्याच्या शिक्षणातील तंत्रज्ञानाचे महत्व, ऑनलाइन व्यापाराच्या संधी, ऑनलाईन व्यवसायाचे प्रकार वस्तू, सेवा विक्री, ऑनलाईन फ्रीलान्सिंग संधी, घरातून सुरु करता येणाऱ्या ऑनलाईन व्यवसाय कल्पना <br> **४. वैयक्तिक व्यक्तीमत्व विकास कार्यक्रम -** <br> स्व-ओळख व आत्मविश्वास वाढविणे, संवाद कौशल्य, व्यक्तिमत्व विकास, सूत्रसंचालन, Event Management, वेळेचे योग्य नियोजन <br> **५. कचरा व्यवस्थापन आणि पुनर्वापर यांचे प्रशिक्षण-** <br> कार्बन फुटप्रिंट कमी करणेबाबत, कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व, घरगुती कचऱ्याचे वर्गीकरण, घरगुती वस्तूंचा पुनर्वापर, घरगुती कंपोस्ट तयार करणे. <br> **६. जाणीव व जागृती-** <br> बाल कायदेविषयक जागृती, महिलांसाठी आरोग्य, हुंडा बंदी, स्त्री-भ्रूण हत्या विषयक जागृती पनवेल कनेक्ट ॲप, वेबसाईट वरील महिला व बालकल्याण विभागातील विविध योजनांची माहिती, अर्जप्रकिया. | ३ दिवस | |
| २. | **वाचन साहित्य व प्रशिक्षण किट** | | |

सीलबंद दरपत्रके दिनांक १६/७/२०२५ रोजी दुपारी १२.०० पर्यंत पनवेल महानगपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागात अथवा samup.pmc@gmail.com वर स्वीकारण्यात येतील.
मा. अतिरिक्त आयुक्त यांच्या मान्यतेने

**सही/-**
**(मंगला माळवे)**
**उपायुक्त**
**पनवेल महानगर पालिका**

**जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ३१७/३२३/२०२५**
**दिनांक :- ०८/०७/२०२५**

# खालापूर पोलिसांनी भंगारमाफियांना अहमदाबादमधून केली अटक

**खोपोली : बातमीदार**

वावोशी गावचे हददीत होराळे येथील नेमको कारखान्यात वजन काटा मध्ये हात चलाखीने फेरफार करून सुमारे ८लाख ९२हजार २४०रुपये किंमतीचा सुमारे २३हजार ४८० किलोग्रॅम वजनाचे भंगार (स्क्रॅप) माल चोरी प्रकरणी खालापूर पोलिसांनी मोहित भक्त बहादूर मोर, गौरवकुमार नरेशभाई मानवाला,संजय कालिदास पटनी आणि प्रकाश रमेश भाई पटणी (सर्व राहणार अहमदाबाद गुजरात) यांना अटक केली आहे या टोळीकडून सर्व माल हस्तगत करण्यात खालापूर पोलिसांना यश मिळाले आहे.

खालापूर पोलीस ठाणे हद्दीत असलेली नेमको कारखान्यात वजन काटावर काम करणारा मोहित भक्त बहादूर मोर आणि अहमदाबाद येथील दृष्टी एंटरप्रायझेसचे गौरवकुमार व पटणी यांनी आपआपसात संगनमत केले होते. वजन काट्यात मोहित यांनी फेरफार केला होता. हा फेरफार कारखाना व्यवस्थापनाच्या लक्षात आल्यानंतर या सर्व आरोपी विरोधात तक्रार नोंदविण्यात आली होती.

गुन्ह्याचा तपास करण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार मोहन बहाडकर, पोलीस हवालदार विशाल शिंदे, शरद फरांदे, बाळ जाधव यांचे पथक तपास करण्यासाठी अहमदाबाद येथे गेले होते. या गुन्ह्यातील आरोपींना अहमदाबाद येथून अटक केली असून अपहार केलेला भंगार माल दहिसर ठाणे येथून हस्तगत केला आहे.

### महावितरण — ई-निविदा सूचना

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा-या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-३७, टी-३८, टी-३९, टी-४०, टी-४१, टी-४२, आणि टी-४३ (२०२५-२६) अशा एकुण **सात** निवीदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी **दि. ०९.०७.२०२५ पासून ते दि. १५.०७.२०२५** पर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख **दि. १६.०७.२०२५ ला दुपारी १.००** वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल.

**(सही)**
**कार्यकारी अभियंता (स्था.) , स्थापत्य विभाग भांडुप**

## पनवेल महानगरपालिका
### ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा क्र. | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | ई-निविदा किंमत रक्कम रुपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिका हददीतील भिंगारी येथील प्राथमिक शाळेचे वाढीव बांधकाम करणे. टप्पा-३ (व्दितीय वेळ) | PMC/PWD/ C.E./१३/ २०२५-२६ | ६६,३५,३७१/- (GST वगळून) | १,१८०/- | १२ महिने |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०९/०७/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**( गणेश शेटे)**
**अतिरिक्त आयुक्त I**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल**

**जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ३१५/३२१/२०२५**
**दिनांक :- ०८/०७/२०२५**

# घरफोडीच्या घटना, सावधगिरी बाळगा!

## श्रीवर्धन तालुक्यात पोलिसांचे आवाहन



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील बंदर गोठण जीवना गावात एका ६० वर्षीय नागरिकाच्या घरात चोरी झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. घरातील बेडरूमच्या स्लायडिंग खिडकीतून अनोळखी आरोपीने आत प्रवेश करून सुमारे १.२५ लाख रुपयांचा ऐवज लंपास केल्याने ग्रामस्थांत भीतीचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे घरफोडीच्या घटनांपासून सावधगिरी बाळगा, असे आवाहन श्रीवर्धनमध्ये पोलिसांनी स्थानिकांना केले आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, बंदर गोठण जीवना येथील रहिवासी संतोष गोविंद गुरव (वय ६०, व्यवसाय: मिस्त्री कामगार) हे आपल्या कुटुंबासमवेत राहत असताना, २० जून २०२५ रोजी सकाळी ७.३० वाजल्यापासून ते ६ जुलै २०२५ रोजी रात्री ९ वाजेपर्यंतच्या कालावधीत ही घरफोडी झाल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे.

तक्रारीनुसार, आरोपीने बेडरूमच्या ग्रील नसलेल्या स्लायडिंग खिडकीतून घरात प्रवेश केला. भीतीत ठेवलेल्या लाकडी कपाटाचे कोणत्यातरी हत्याराच्या सहाय्याने उचकटून कपाटातील सुटकेसचे लॉक तोडले. त्यानंतर सुटकेसमधील सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेण्यात आली.

अंदाजे ३.५ ग्रॅम वजनाचे, त्रीकोणी लॉकेट असलेले सोन्याचे गंठण (१,०५,००० रुपये, पाच ग्रॅम वजनाची सोन्याची कर्णपुले (१५,०००/, ५,०००/- रुपये रोख ५०० रुपयांच्या १० नोटा, याप्रमाणे एकूण अंदाजे १,२५,०००/- रुपयांचा ऐवज चोरीला गेला.

या प्रकरणी श्रीवर्धन पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४५/२०२५ प्रमाणे भारतीय दंड संहिता २०२३ च्या कलम ३०५ (अ), ३३१ (३), ३३१ (४) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सध्या अज्ञात असून त्याचा मागील गुन्हेगारी इतिहास नाही.

फिर्यादी संतोष गोविंद गुरव यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून पोहवा टी.व्ही. कांबळे यांनी गुन्हा नोंद केला आहे. या गुन्ह्याचा तपास पोसई एस.बी. पाटील करत आहेत. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली, पो नि यु.बी. रिकामे यांच्या देखरेखीखाली तपास सुरू आहे.पोलिसांनी स्थानिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन केले असून, घराच्या खिडक्या, दरवाजे योग्यरित्या बंद ठेवणे, ग्रील बसवणे आणि परिसरात संशयास्पद हालचाली दिसल्यास पोलिसांना तत्काळ माहिती देण्याचे आवाहन केले आहे.

फिर्यादीने उशीरा तक्रार दाखल केल्याने गुन्हा नोंद करण्यात विलंब झाल्याचेही पोलिसांनी स्पष्ट केले. चोरीचे मुख्य उद्दिष्ट आर्थिक लाभ असल्याचे प्राथमिक चौकशीतून स्पष्ट झाले आहे.

या घटनेमुळे बंदर गोठण परिसरात एकच खळबळ उडाली असून, श्रीवर्धन पोलिसांकडून आरोपीच्या शोधासाठी विशेष पथक तयार करण्यात आले आहे. पोलिसांचा तपास सुरू असून लवकरच आरोपीला अटक होण्याची अपेक्षा आहे.

# रायगडातील आरोग्यसेवांच्या सुधारणेबाबत सामंजस्य करार



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील आरोग्यसेवांच्या उपलब्धतेमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि आरोग्य सेवांची गुणवत्ता वाढवण्यासाठी महत्त्वाचा टप्पा म्हणून स्वदेस फाउंडेशन आणि रायगड जिल्हा सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्यात सामंजस्य करार जिल्हाधिकारी किशन जावळे व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांचे उपस्थीतीत सोमवारी (दि. ७) करण्यात आला.

सामंजस्य करारनाम्यावर स्वाक्षरी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील व जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे वतीने डॉ.नितीन बावडेकर, स्वदेस फाउंडेशन यांचे वतीने मंगेश वांगे, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि डॉ. सुरेंद्र यादव, उपसंचालक आरोग्य - स्वदेस फाउंडेशन यांनी केली. महाराष्ट्र राज्य सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सूचनेनुसार हा सामंजस्य करार करण्यात आला.

या करारनाम्याचा मुख्य उद्देश शासनाच्या आरोग्यसेवा मजबूत करणे आणि ग्रामीण समुदायासाठी दर्जेदार आरोग्यसेवा पुरवण्यात मदत करणे हा आहे. या सहकार्याद्वारे स्वदेस फाउंडेशन आणि रायगड जिल्हा सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या मार्फत सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला अधिक बळकट करण्यासाठी मदत करणार आहे. ही भागीदारी समुदायावर आधारित शासकीय आरोग्य कार्यक्रमांबाबत जनजागृती वाढवेल आणि अत्यावश्यक आरोग्य सेवा शेवटच्या टप्प्यापर्यंत पोहोचविण्याची खात्री करेल.

रॉनी स्क्रूवाला आणि झरीना स्क्रूवाला यांची स्वदेस फाउंडेशन रायगड जिल्हामधील महाड, पोलादपूर, माणगाव, तळा, श्रीवर्धन, म्हसळा व सुधागड या तालुक्यामध्ये ग्रामीण सक्षमीकरणासाठी समग्र ३६०-अंश दृष्टिकोनातून कार्य करणारी स्वयंसेवी संस्था या तालुक्यामध्ये सामंजस्य करारा मुळे फायदा होणार आहे

सामंजस्य कराराच्या वेळी उपजिल्हाधिकारी रवींद्र शेळके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण यंत्रणा प्रियदर्शनी मोरे, तसेच स्वदेस फाउंडेशनचे संचालक प्रदीप साठे, तुषार इनामदार वरिष्ठ व्यवस्थापक नजीर शिकलगार व मेघना फडके व सहाय्यक व्यवस्थापक जुलेखा शेख उपस्थित होते.

# कोमसाप तळाचे ऑनलाईन कविसंमेलन

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषद शाखा तळा यांचेतर्फे आषाढी एकादशीनिमित्ताने काव्यलेखन स्पर्धा व ऑनलाईन कविसंमेलन रविवारी अतिशय उत्साहात झाले.

कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक, कोमसाप जनसंपर्क प्रमुख रायगडभुषण एल.बी.पाटील होते. तर उद्घाटक म्हणून कोमसाप रायगड जिल्हा अध्यक्ष सुधीर शेठ, प्रमुख अतिथी म्हणून पुरुषोत्तम मुळे, रायगड जिल्हा युवाशक्तीप्रमुख सिध्देश लखमदे उपस्थित होते.

काव्यसंमेलनात संध्या पोटफोडे, सीमा रिसबूड, अनिता कांबळे, उल्का माडेकर, नरेश पाटील, मिनल ढवळे, जयश्री पोळ, सुधाकर पाटील, जान्हवी पालकर, नैनिता कर्णिक, दीपक सकपाळ, प्रज्ञा सवदत्ती, मीनल वसमतकर, प्रतिक्षा नगरकर, हेमंत बारटक्के यांनी कविता सादरीकरणातून विठू माऊलीचा गजर केला.

काव्यलेखन स्पर्धेचे विजेते प्रथम-रंजना करकरे, द्वितीय-सायराबानू चौगुले, तृतीय-प्रतिक्षा नगरकर व दिगंबर आडित, उत्तेजनार्थ-दीपक सकपाळ, केतकी सुतार, शामसुंदर गावकर यांनी पटकावले. परिक्षकाचे काम गझलकार प्रा.नागेश नायडू व निवेदन व आभारप्रदर्शन प्रणय इंगळे यांनी केले.

# माणगावमधील विविध शाळांत वह्यावाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

चारिझेन फाऊंडेशन मार्फत रायगड जिल्हा परिषद शाळा वारक आदिवासीवाडी, कालवण, कालवण आदिवासीवाडी येथे शनिवारी वह्या वाटपाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

सदर कार्यक्रमास चारिझेन फाऊंडेशनचे अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा, केंद्रप्रमुख शंकर शिंदे, चारिझेन फाऊंडेशनचे उपाध्यक्ष सतीश काळे, चारिझेन फाऊंडेशनचे मार्केटिंग हेड राकेश पडवळ, वारक आदिवासीवाडीचे शिक्षक जयेंद्र वाघमारे, संदेश सोंडकर, शाळा व्यवस्थापन समिती व पालक उपस्थित शाळा - कालवणचे शिक्षक, मुख्याध्यापक बाळकृष्ण भायदे, भाग्यश्री सरकाळे, सुहास चांदोरकर, संतोष म्हापार्ले, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संजय वाढवळ, सदस्य व पालक, कालवण आदिवासीवाडीचे शिक्षक रविंद्र लाडघरे,समृध्दी सोंडकर,विघवली केंद्रप्रमुख विठोबा उभारे,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, पालक व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.



# ॲड. साबळे यांच्या जन्मदिनी माणगावमध्ये रक्तदान शिबिर

## २५०हून अधिकांचा सहभाग

**माणगाव : बातमीदार**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ आणि अशोकदादा साबळे स्मृती प्रतिष्ठान, माणगांव यांच्या संयुक्त विद्यमाने ॲड. राजीव साबळे यांच्या ६० व्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला असून, दुपारी २.३० वाजेपर्यंत २५० हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान करून आपली सामाजिक बांधिलकी जपली.



या रक्तदान शिबिराचे आयोजन समाजहिताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरले असून, ॲड. राजीव साबळे यांच्या सामाजिक कार्याची ही प्रेरणादायक छाया अनेकांना पुढे चालण्यास मार्गदर्शक ठरत आहे.

# कित्ते भंडारी हितवर्धक मंडळाचा वर्धापन दिन



**अलिबाग : प्रतिनिधी**

कित्ते भंडारी हितवर्धक मंडळाच्या ६७ व्या वर्धापन दिन रविवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वर्धापन दिनाचे औचित्य साधुन मंडळातर्फे कित्ते भंडारी समाजातील विविध क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा श्रीबाग येथील कै. गोविंद बाबू नार्वेकर सभागृहात सत्कार करण्यात आला.

सुरुवातीला संस्थेचे कित्ते भंडारी हितवर्धक मंडळाचे अध्यक्ष बळवंत शिर्से कर यांच्या हस्ते कार्यालयात गणेश पुजन करण्यात आले. तर ज्येष्ठ विश्वस्त नरहरी धनाजी तथा तोडणकर गुरुजी यांच्या उपस्थिती मध्ये सुहास मयेकर यांच्या हस्ते श्रीफळ वाढविण्यात आले.

या वेळी राजनभाई नार्वेकर, वृषाली कचरेकर, प्रफुल्ल मोरे, नंदकुमार मयेकर, बाबा मोहिते, दर्शन पारकर, हरिश्चंद्र शिरधनकर, आदिक नार्वेकर, दत्तदास मयेकर, प्रफुल्ल नागवेकर, दिनेश बिर्जे, उपाध्यक्ष कमळाकर पडवळ, मधुकर पारकर, खजिनदार राम मोरे, सदस्य संतोष मोरे, सुहास मयेकर, प्रथमेश नार्वेकर, तुकाराम शिलधनकर, विजया सनदी लेखापाल संजय राऊत यांच्यासह कार्यकारीणी सदस्य यशवंत राऊत, राजेंद्र बांदीवडेकर, दत्तात्रय म्हात्रे, सचिन खेऊर आदी उपस्थित होते.

या वेळी विश्वस्त नरहरी धनाजी तथा तोडणकर गुरुजी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना कित्ते भंडारी हितवर्धक मंडळाच्या कार्याचा आढावा घेतला. अध्यक्ष बळवंत शिर्सेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर सनदी लेखापाल संजय राऊत यांनी भविष्यातील वाटचालीचा आढावा घेतला. सूत्रसंचलन सुशील विलणकर यांनी केले.

# नागोठणे आरोग्य केंद्रात फळ, ब्लँकेट, बेडशीट, उशीवाटप

**नागोठणे : बातमीदार**

खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त सुतारवाडी (रोहा) येथे खा. तटकरे यांच्या कार्यालयात उपस्थित राहणार आहेत. खा. तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेस नागोठणे शहर व विभागातील कार्यकर्ते विविध लोकपोयोगी उपक्रम राबवित आहेत.

याच अनुषंगाने मंगळवारी नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णांना फळ वाटप, दवाखान्यासाठी ब्लँकेट, बेडशीट व उशी वाटप करण्यात आले. तदनंतर उपस्थित नेतेगणांनी खासदार सुनिल तटकरे यांना उदंड





व निरोगी आयुष्य लाभावे यासाठी प्रार्थना करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात संपन्न झालेल्या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शिवरामभाऊ शिंदे, हरीशशेठ काळे, विलास चौलकर, चंद्रकांत गायकवाड, नागोठणे विभागीय अध्यक्ष संतोषभाई कोळी, शहर अध्यक्ष बाळासाहेब टके, सुधाकर जवके, प्रकाशशेठ जैन, अनिलशेठ काळे, सचिन कळसकर, अतुल काळे, सुनिल लाड, सुधाकर पारंगे, राजेंद्र शिंदे, बिपीन सोष्टे, प्रथमेश काळे, मनोज टके, चेतन टके, केतन भोय, विजय पारंगे, रोशन पारंगे, अंकुश ताडकर, सखाराम ताडकर, घनश्याम ताडकर, तात्या पोत्रिक, महिला आघाडीच्या नेत्या रिचा धात्रक, सुजाता जवके, आशा शिर्के, अमिता शिंदे, निष्ठा विचारे, पुनम काळे, प्रतिभा तेरडे यांच्यासह प्राथमिक आरोग्य केंद्र नागोठणेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. आदित्य सिरसाट, आरोग्य सहाय्यक राजेंद्र पवार, भारत मारकड, आरोग्य सहाय्यिका फुलावती पवार, आरोग्य सेवक वंदन तांबोळी, जगदीश मोकल, उत्तम जाधव आदिंसह कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

# श्री कपालेश्वर देवस्थान व शिवतांडव प्रतिष्ठानतर्फे 'कर्जतकरांची वारी'



**कर्जत : प्रतिनिधी**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने श्री कपालेश्वर देवस्थान आणि शिवतांडव प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने 'कर्जतकरांच्या वारीचे' आयोजन करण्यात आले होते. या वारीमध्ये कर्जतकरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कपालेश्वर मंदिरातील श्री विठ्ठल रुक्मिणीची पूजा अमोल देशमुख व कोमल देशमुख या उभयतांच्या हस्ते करण्यात आली. शिवलाल गुप्ता, हेमंत डोंबे, गणेश गवई यांनी प्रसादासाठी सहकार्य केले. लोकमान्य टिळक चौकातून वारीचा प्रारंभ झाला. कपालेश्वर देवस्थानाचे अध्यक्ष महेंद्र बोडके, वनिता म्हसे, लिलाताई चंदन, पद्माकर गांगल, अभिजित मराठे, समीर सोहनी तसेच शिवतांडव प्रतिष्ठानचे नमिता दांडेकर, नारायण पाटील, रितेश जाधव, निहार व्यापारी यांच्या पुढाकाराने ही वारी निघाली. या वारीच्या पुढे महिला मंडळ संचलित विद्या विकास मंदिर शाळेच्या संतांच्या वेशभूषातील विद्यार्थी होते.

ही वारी शिवतांडव प्रतिष्ठानच्या ढोल पथक सदस्यांनी भजनाच्या तालावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, आमराई मार्गे प्रति आळंदी - पंढरपूर येथे आली. आमदार महेंद्र थोरवे, माजी उपसभापती मनोहर थोरवे, माजी नगरसेवक संकेत भासे यांनी वारीतील सहभागी झालेल्यांचे स्वागत केले.

या वेळी राजाभाऊ कोठारी, संतोष वैद्य, सुनील गोगटे, डॉ. राजू थोरवे, सदानंद जोशी, सुरेखा शितोळे, सुचिता वांजळे, शैला विशे, स्वाती देशमुख, शर्वरी कांबळे, स्नेहा गोगटे, सीता वाघमारे, प्राची पाटील, दत्तात्रेय म्हसे, सुदाम कार्ले, राहुल शिंदे, अनिल पाटील, सुरेखा देशमुख आदी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत खेळात नैपुण्य मिळवावे -वरदा तटकरे

**रोहे : प्रतिनिधी**

आज विद्यार्थ्यांचा गुणगौरव होत असताना पालकांची, गुरुजन व विद्यार्थ्यांची जबाबदारी वाढली आहे. अभ्यास करत असताना विद्यार्थ्यांनी खेळामध्ये नैपुण्य मिळवावे. पालकांनीही मुलांच्या करीअर विषयी आपले मत लादु नये त्यांची आवड निवड बघूनच विद्यार्थ्यांना त्यांचे करिअर निवडण्याची संधी द्यावी असे प्रतिपादन वरदा सुनील तटकरे यांनी व्यक्त केले. हा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल विजयराव मोरे व विनोद पाशीलकर यांचे त्यांनी आभार ही मानले.

एम.बी. मोरे फाऊंडेशनचे इंग्लिश मिडीयम स्कूल, कनिष्ठ महाविद्यालय आणि महिला पदवी महाविद्यालय, प.पु. पांडुरंग शास्त्री आठवले औद्योगिक विद्यालय, धाटाव येथे रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या ७० व्या वाढदिवसाचे औचित्य साधून रोहा तालुक्यातील माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी.) मार्च २०२५ मधील गुणंवत्त विद्यार्थ्यांचा सत्कार व वृक्षारोपण कार्यक्रमाच्यावेळी व्यक्त केले.




या वेळी माजी आमदार अनिकेत तटकरे, प्रभाताई सकपाळ, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, जिल्हा उपाध्यक्ष शंकरराव भगत, तालुका अध्यक्ष विनोद पाशीलकर, माजी उपसभापती अनिल भगत, सुदर्शन केमिकल्स साईड हेड विवेक गर्ग, एक्सेल कंपनीचे जनसंपर्क अधिकारी बापु जोशी, अशोकराव मोरे, वैशाली गावंड, जयवंत मुंढे आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे नियोजन एम बी मोरे फाऊंडेशनच्या स्कूल आणि महाविद्यालय, धाटाव औद्योगिक विद्यालयाचे, कर्मचारी यांनी मुख्याध्यापिका तेजल सावंत, प्राचार्य प्रसन्न म्हसळकर, मुख्याध्यापक वसंत थोरात आणि वरिष्ठ शिक्षक हणमंत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पूर्ण केले.

# मोरे स्कूलमध्ये आषाढी एकादशी

**रोहे : प्रतिनिधी**

आषाढी एकादशीच्या शुभदिनी एम. बी. मोरे फाउंडेशनच्या इंग्लिश मीडियम स्कूल, धाटाव-रोहा येथे एक अद्वितीय आणि भक्तिमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या विशेष दिवशी शाळेमध्ये वारकरी वारीचे सुंदर आयोजन झाले, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी भक्तिभावाने पालखी दिंडी काढली.

शाळेच्या परिसरात 'विठ्ठल नामाचा गजर' करत सर्व विद्यार्थ्यांनी टाळ-मृदंगाच्या तालावर भक्तीमय वातावरण निर्माण केले. विठ्ठलाची आरती करण्यात आली आणि सर्वांनी एकत्रितपणे श्री विठ्ठल-रुखमाईचा जयघोष केला. त्यानंतर शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीची माहिती देत काही प्राचीन कथा सांगितल्या, ज्यामुळे विद्यार्थ्यांना या सणाचे आध्यात्मिक महत्त्व समजले.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पारंपरिक पोशाखात सुंदर सांस्कृतिक नृत्य सादर केली, तसेच काही विद्यार्थ्यांनी भक्तिभावाने भाषण करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी वाऱ्याच्या तालावर 'रिंगण' करून पंढरपूरच्या वारीची अनुभूती शाळेच्या प्रांगणात घेतली.

या कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका तेजल जयेश सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमात सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



# ‘सेना’ देशांत टीम इंडिया नंबर वन!

## इंग्लंडला शह देत पाकिस्तानलाही धोबीपछाड

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने बर्मिंगहॅमच्या एजबॅस्टन स्टेडियमवर ऐतिहासिक विजय नोंदवला. इंग्लंडला पराभूत करत टीम इंडियाने अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफीसाठी सुरू असलेल्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-१ अशी बरोबरी साधलीये. याशिवाय एजबॅस्टनच्या मैदानातील पहिल्या विजयासह अनेक विक्रमही टीम इंडियाने आपल्या नावे केले. इंग्लंडला शह देत भारतीय संघाने पाकिस्तानलाही धोबीपछाड देण्याचा डाव साधला आहे.



भारतीय संघ एजबॅस्टनच्या मैदानात एक हजार धावा करण्यासोबत कसोटी सामना जिंकणारा पहिला आशियाई संघ ठरला आहे. या विजयासह सेना (दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया) देशांत सर्वाधिक कसोटी सामने जिंकणाऱ्या आशियाई देशांमध्ये टीम इंडिया अव्वलस्थानी पोहचली आहे. पाकिस्तानला मागे टाकत टीम इंडियाने नंबर वनचे स्थान पटकावले.

एजबॅस्टनच्या मैदानातील विजयासह भारतीय संघाने ‘सेना’ देशांतील १७८ सामन्यात ३० कसोटी सामने जिंकले आहेत. पाकिस्तानने दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाच्या मैदानात १४८ कसोटी सामन्यात २९ विजय मिळवल्याचा रेकॉर्ड आहे. या यादीत श्रीलंकेचा संघ ७६पैकी नऊ सामन्यातील विजयासह तिसऱ्या स्थानावर आहे. बांगलादेशच्या संघाने या चार देशांत २५ सामने खेळले असून त्यांना फक्त न्यूझीलंडविरुद्ध एक विजय मिळवण्यात यश आले आहे.

भारतीय संघ इंग्लंड उर्वरित तीन कसोटी सामन्यात सर्वोत्तम कामगिरी करून मालिका जिंकण्यासह ‘सेना’ देशांतील रेकॉर्ड अधिक भक्कम करण्याच्या इराद्याने मैदानात उतरेल. भारत-इंग्लंड यांच्यातील तिसरा कसोटी सामना क्रिकेटची पंढरी समजल्या जाणाऱ्या लॉर्ड्सच्या मैदानात रंगणार आहे. लीड्स येथील हेडिंग्लेच्या मैदानात भारतीय संघाच्या पदरी पराभव पडला असला तरी या सामन्यातही टीम इंडियाने कमालीची कामगिरी केली होती. त्यामुळेच उर्वरित तीन सामन्यात टीम इंडियाकडून खास कामगिरीची अपेक्षा असेल.

# आकाश दीपचा ‘तो’ चेंडू योग्यच असल्याचे एमसीसीकडून समर्थन

**लंडन : वृत्तसंस्था**



भारतीय संघाने बर्मिंगहम कसोटीत ऐतिहासिक विजय मिळवत इंग्लंडविरूद्ध मालिकेत बरोबरी साधली आहे. आकाश दीपने दुसऱ्या कसोटी सामन्यात १० विकेट्स घेतले. यामधील सर्वात मोठी विकेट होती जो रूटची. पण जो रूट ज्या चेंडूवर त्रिफळाचीत झाला, तो बॅकफूट नो बॉल असल्याचा वाद सुरू आहे.

जसप्रीत बुमराहच्या जागी एजबेस्टन कसोटी सामन्यात समावेश करण्यात आलेल्या वेगवान गोलंदाज आकाश दीपने संधीचे सोने करत उत्कृष्ट कामगिरी केली. या सामन्यात आकाश दीपच्या एका चेंडूची चर्चा आहे, ज्यामध्ये त्याने जो रूटला बाद केले आहे. अनेक तज्ज्ञांच्या मते, आकाश दीपचा चेंडू बॅकफूट नो-बॉल घोषित करायला हवा होता, ज्यामध्ये मेरीलेबोन क्रिकेट क्लब म्हणजेच एमसीसीचे विधानदेखील आले आहे.

एमसीसीने म्हटले आहे की, एजबेस्टनच्या मैदानावर भारत आणि इंग्लंड यांच्यातील चौथ्या दिवसाच्या खेळादरम्यान आकाश दीपने जो रूटला टाकलेल्या चेंडूवर चाहते आणि समालोचकांकडून तो नो बॉल म्हणत प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. चेंडू टाकत असताना आकाश दीपचा मागचा पाय क्रीजच्या बाहेर असल्याचे दिसले आणि पंचांनी हा चेंडू योग्य चेंडू असल्याचे म्हटले. एमसीसी सांगू इच्छिते की, नियमाप्रमाणे पंचांचा हा निर्णय अगदी योग्य आहे.

गोलंदाजाच्या पायाबाबतची महत्त्वाची माहिती पुढे देताना सांगितले, सुरुवातीला मैदानावर पाय जिथे लँड झाला आणि टच झाला तेच महत्त्वाचे असे एमसीसी मानते. पायाचा भाग जमिनीला स्पर्श करताच तो पाय रेषेच्या आतील भागात आहे. म्हणजेच आकाशदीपचा पाय लँड झाला तेव्हा तो रेषेच्या आतमध्ये होता. त्यामुळे नियमाप्रमाणे तो कायदेशीर चेंडू होता आणि पंचांचा निर्णय योग्य होता.

# शुबमन गिलला सर ब्रॅडमन यांचा जुना विश्वविक्रम मोडण्याची संधी

**लंडन : वृत्तसंस्था**

भारतीय कसोटी संघाचा कर्णधार शुबमन गिलने इंग्लंडविरुद्धच्या सुरुवातीच्या दोन कसोटी सामन्यांमध्ये धावांचा अक्षरशः पाऊस पाडला आहे. त्याच्या या दमदार खेळीमुळे भारतीय संघाने पहिल्या सामन्यात ८३५ धावा, तर दुसऱ्या सामन्यात तब्बल १०१४ धावा जमवल्या. सध्या सुरू असलेल्या मालिकेत गिल सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे. त्याने दुसऱ्या सामन्याच्या पहिल्या डावात द्विशतक आणि दुसऱ्या डावात शतक झळकावले. याच उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर एका मालिकेत सर्वाधिक धावा करण्याच्या सर डॉन ब्रॅडमन यांच्या विश्वविक्रमाला त्याने आव्हान दिले आहे.

इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत गिल ज्या फॉर्मात खेळत आहे, ते पाहता तो ऑस्ट्रेलियाचे माजी दिग्गज फलंदाज ब्रॅडमन यांचा एका मालिकेत फटकावलेल्या ९७४ धावांचा विश्वविक्रम मोडू शकतो. ही मजल मारण्यासाठी त्याला मालिकेतील उर्वरित तीन सामन्यांमध्ये ३९० धावा कराव्या लागतील.

ब्रॅडमन यांनी १९३०मध्ये इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या अ‍ॅशेस मालिकेत मालिकेत ९७४ धावा कुटल्या होत्या. या दरम्यान त्यांनी चार शतके झळकावली. त्यांची सर्वोच्च धावसंख्या ३३४ होती.



### गिलने कोहलीला मागे टाकले

गिलने या इंग्लंड दौऱ्यातील पहिल्या दोन कसोटी सामन्यांमध्ये ५८५ धावा केल्या आहेत. मालिकेतील पहिल्या दोन कसोटी सामन्यांनंतर ही दुसरी सर्वोच्च धावसंख्या आहे. पहिल्या क्रमांकावर ग्रॅमी स्मिथ आहे, ज्याने २००३मध्ये इंग्लंडमध्ये ६२१ धावा केल्या होत्या. कर्णधार म्हणून पहिल्या दोन कसोटी सामन्यांमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज म्हणून गिलने आता अव्वल स्थान पटकावले आहे. त्याने विराट कोहलीच्या ४४९ धावांना मागे टाकले. गिल हा एकाच कसोटीच्या दोन्ही डावांत १५०पेक्षा अधिक धावा करणारा तो दुसरा फलंदाज ठरला आहे. यापूर्वी १९८०मध्ये अ‍ॅलन बॉर्डर यांनी पाकिस्तानविरुद्ध लाहोरमध्ये नाबाद १५० आणि १५३ धावा करून अशी कामगिरी केली होती.

दरम्यान, गिल हा ब्रॅडमन यांना मागे टाकण्यापूर्वी माजी कर्णधार सुनील गावसकर यांचे दोन विक्रम मोडीत काढण्याची संधी आहे. त्यासाठी त्याला १८९ आणि १४७ धावांची गरज आहे. गावसकर यांनी १९७१मध्ये वेस्ट इंडिजविरुद्धच्या चार सामन्यांच्या मालिकेत ७७४ धावा केल्या होत्या. त्यांचा हा विक्रम आजही अबाधित आहे. कोणत्याही भारतीय फलंदाजाला हा विक्रम मोडता आलेला नाही.

या यादीत दुसऱ्या क्रमांकावरही लिटील मास्टर गावस्कर हेच आहेत, ज्यांनी १९७८-७९मध्ये कॅरेबियन संघाविरुद्धच्या मायदेशातील मालिकेत सहा कसोटी सामन्यांत ७३२ धावा केल्या होत्या.

गिलने एजबॅस्टन कसोटीत इंग्लंडविरुद्ध ४३० धावांचा पाऊस पाडला, जी कसोटी क्रिकेटमधील एका सामन्यातील दुसरी सर्वाधिक धावसंख्या आहे. या यादीत पहिल्या क्रमांकावर इंग्लंडचे माजी कर्णधार ग्रॅहम गूच आहेत, ज्यांनी १९९०मध्ये भारताविरुद्धच्या लॉर्ड्स कसोटी सामन्यात ४५६ धावा केल्या होत्या.

एकाच कसोटीत शतक आणि द्विशतक झळकावणाऱ्या नऊ फलंदाजांपैकी गिल एक बनला आहे. गिलपूर्वी दोन भारतीय कर्णधारांनी एका कसोटीच्या दोन्ही डावांत शतके झळकावली होती. गावसकर यांनी १९७८मध्ये ईडन गार्डन्सवर वेस्ट इंडिजविरुद्ध १०७ आणि नाबाद १८२ धावा, तर विराट कोहलीने २०१४मध्ये अ‍ॅडलेड येथे ऑस्ट्रेलियाविरुद्ध ११५ आणि १४१ धावा केल्या होत्या.

यासोबतच इंग्लंडमध्ये कसोटीच्या दोन्ही डावांत शतक झळकावणारा गिल हा दुसरा भारतीय फलंदाज आहे.

# पृथ्वी शॉ महाराष्ट्र संघाकडून खेळणार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या रणजी संघाला राम राम करणारा भारतीय संघाचा आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू आणि युवा स्टार पृथ्वी शॉ आगामी रणजी हंगामापासून महाराष्ट्राच्या संघातून खेळताना दिसणार आहे. ऋतुराज गायकवाड याच्यासोबत तो सलामीला उतरणार आहे. पृथ्वीच्या येण्याने महाराष्ट्राची ताकद आणखी वाढली आहे.

पृथ्वी शॉने कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० अशा तिन्ही आंतरराष्ट्रीय फॉरमॅटमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. त्याचप्रमाणे आयपीएल आणि देशांतर्गत क्रिकेटमध्येही त्याने सातत्यपूर्ण व भरीव कामगिरी करत स्वतःची एक स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्याच्या नेतृत्वाखाली भारताने २०१८ साली अंडर-१९ विश्वचषक जिंकला होता. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये त्याच्या नावावर १३ शतके आणि ४५००हून अधिक धावा आहेत. ऋतुराज गायकवाड हा महाराष्ट्राचा कर्णधार आहे. त्यामुळे पृथ्वी शॉ आता ऋतुराजच्या नेतृत्वाखाली खेळताना दिसणार आहे. पुण्यातील गाहुंजे स्टेडियम हे आता पृथ्वीचे नवे होम ग्राऊंड असणार आहे. ऋतुराज गायकवाड आणि पृथ्वी हे दोघे डावाची सुरुवात करताना दिसतील.

# विम्बल्डनमध्ये सिनरने जिंकली चाहत्यांची मने



**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या विम्बल्डन टेनिस स्पर्धेत जबरदस्त खिलाडूवृत्तीचे प्रदर्शन पहायला मिळाले. जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या जॅनिक सिनरविरुद्धच्या सामन्यात ग्रिगोर दिमित्रोव्हला दुखापतीमुळे चौथ्या फेरीच्या लढतीतून माघार घ्यावी लागली. या वेळी सिनरची कृती सर्वांनाच भावली.

१९व्या मानांकित दिमित्रोव्हने जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या सिनरवर ६-३, ७-५ अशी आघाडी घेत अलिकडच्या काळातील सर्वोत्तम कामगिरी केली होती, पण तिसऱ्या सेटच्या सुरुवातीला, ३४ वर्षीय ग्रिगोर दिमित्रोव्ह अचानक मैदानावर पडला. त्याच्या छातीत वेदना जाणवत होत्या. उजव्या बाजूच्या पेक्टोरल दुखापतीमुळे त्याला वैद्यकीय मदत घ्यावी लागली, परंतु त्यानंतर त्याला कोर्ट सोडावे लागले. या वेळी कोर्ट सोडताना त्याला अश्रू अनावर झाले होते.

दिमित्रोव्ह मैदानावर पडताच २३ वर्षीय सिनर ताबडतोब त्याच्या प्रतिस्पर्ध्याजवळ गेला आणि दिमित्रोव्हची वैद्यकीय तपासणी होईपर्यंत तो त्याच्यापाशी थांबला. या दरम्यान सामना अधिकृतपणे थांबवण्यात आला. यानंतर सिनरने दिमित्रोव्हला त्याचे सामान गोळा करण्यास आणि त्याची किट बॅग कोर्टवरून बाहेर नेण्यास मदत केली.

# राज्य कबड्डी पुरस्कार जाहीर

## रामभाऊ घोडके यांना जीवन गौरव सन्मान

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या विद्यमाने प्रतिवर्षी कबड्डीमहर्षी स्व. बुवा साळवी यांचा १५ जुलै हा जन्मदिन कबड्डी दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या वर्षी रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या विद्यमाने हा २५वा कबड्डी दिन अलिबाग तालुक्यातील पोयनाड येथील जय मंगल कार्यालयात साजरा करण्यात येणार आहे.

रामभाऊ घोडके यांना कबड्डीमहर्षी स्व. शंकरराव (बुवा) साळवी कबड्डी जीवन गौरव, जया शेट्टी, खासदार नरेश म्हस्के यांना कृतज्ञता, जे.जे. पाटील, प्रभाकर लकेश्री यांना रमेश देवाडीकर श्रमयोगी कार्यकर्ता, तर संकेत सावंत, मंदिरा कोमकर यांना स्व. मधुसूदन पाटील व स्व. अरुणा साटम पुरस्कार राज्य कबड्डी संघटनेच्या वतीने मंगळवारी जाहीर करण्यात आले.



यंदाचे क्रीडा पत्रकार पुरस्कार मुंबई दै. पुढारीचे सुनील सपकाळ व पुणे दै. सामनाचे विठ्ठल देवकाते यांना जाहीर झाले. ज्येष्ठ खेळाडू म्हणून जीवन पैलकर (मुं. शहर), ज्ञानेश्वर कुंभार (उपनगर), रवींद्र निळकंठ देसाई (ठाणे), नामदेव राठोड (हिंगोली), कुमुद कागलकर-परांडेकर (सांगली), भास्कर सूर्यवंशी (लातूर), चंद्रकांत काटे (पुणे), नलिनी खेडेकर-पवार (पुणे), दिलीप देवलकर (मुं. शहर) यांना, तर ज्येष्ठ कार्यकर्ता म्हणून मंगेश गुरव (उपनगर), मंगेश मोरे (रत्नागिरी), प्रा. चंद्रकांत सातपुते (परभणी), प्रवीण दळवी (ठाणे), प्रकाश पवार (पुणे) तसेच ज्येष्ठ पंच म्हणून प्रकाश चव्हाण (मुं. शहर), सुरेश जोशी (ठाणे), श्रीकांत चतुर (जळगाव), बळीराम सातपुते (अहिल्यानगर), नवनाथ भालेराव (परभणी), पद्माकर मदन (उपनगर) यांना जाहीर झाले.

स्व. मल्हारपंत बावचकर पुरस्कार प्रत्येकी पाच हजार रुपये पुण्याच्या अजित चौहान व रत्नागिरीच्या समरीन बुरोंडकर यांना देण्यात येणार आहे. राज्य अजिंक्यपद स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणारा जिल्हा म्हणून पुणे जिल्ह्याला गौरविण्यात येईल. शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व अमृत कलश असे पुरस्काराचे स्वरूप राहील. मधुसूदन पाटील व अरुणा साटम पुरस्कारासोबत प्रत्येकी १० हजार रुपये देण्यात येतील. स्व. बाबाजी जामसंडेकर, स्व. मुकुंद (अण्णा) जाधव व कबड्डीमहर्षी स्व. शंकरराव साळवी यांच्या स्मरणार्थ कुमार-कुमारी, किशोर-किशोरी गटातील तीन तीन खेळाडूंना प्रत्येकी पाच हजार रुपये शिष्यवृत्ती देण्यात येईल.

# धोनीने मित्रांसोबत साजरा केला वाढदिवस

**रांची : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी याने सोमवारी (दि. ७) आपला ४४वा वाढदिवस झारखंड राज्य क्रिकेट असोसिएशनच्या (जेएससीए) आपल्या सहकाऱ्यांसोबत केक कापून रात्रीच साजरा केला. याचे फोटो, व्हिडीओ समोर आले आहेत.



वाढदिवसाचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे, ज्यात धोनीने स्लीव्हलेस काळा टी-शर्ट घातलेला आहे आणि केक कापत आहे. त्याच्यासोबत जेएससीएचे अध्यक्ष अजय शाहदेव यांच्यासह कर्मचारी उपस्थित आहेत. धोनी धन्यवाद मित्रांनो, असे केक कापताना म्हणत आहे. या वेळी माही आनंदी दिसत होता. धोनीला भारतीय क्रिकेट नियामक मंडळानेही (बीसीसीआय) शुभेच्छा दिल्या.

आयसीसीच्या मर्यादित षटकांच्या क्रिकेट स्पर्धांमधील तिन्ही ट्रॉफी जिंकणारा जगातील एकमेव कर्णधार असलेला धोनी आंतरराष्ट्रीय आणि आयपीएल कारकिर्दीत मैदानावर शांत व उत्कृष्ट कर्णधारपदाच्या कौशल्यासाठी ओळखला जातो. १५ ऑगस्ट २०२० रोजी धोनीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या सर्व प्रकारातून निवृत्तीची घोषणा केली. धोनीच्या नेतृत्वाखाली भारताने सर्व प्रकारांमध्ये अव्वल स्थान गाठले होते. संघाने २०११मध्ये ५० षटकांचा विश्वचषक आणि २००७मध्ये त्याच्याच नेतृत्वाखाली टी-२० विश्वचषक जिंकला.








दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com